# तृतीय वर्ष कला

## सत्र - V (CBCS)

## अभ्यासपत्रिका क्र. ७

# भाषा विज्ञान आणि मराठी व्याकरण

## विषय कोड - 97101

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्रा. सुहास पेडणेकर**
कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रा. रवींद्र कुलकर्णी**
प्र-कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रा. प्रकाश महानवर**
संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रकल्प समन्वयक** : **प्रा. अनिल बनकर**
कला व मानव्य शाखा प्रमुख,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**अभ्यास समन्वयक व संपादक** : **प्रा. बालाजी कांबळे**
साहाय्यक प्राध्यापक
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**लेखक** : **प्रा. गोविंद काजरेकर**
मराठी विभाग, असोसियट प्रोफेसर,
गोगटे - वाळके महाविद्यालय, बांद्रा,
सावंतवाडी जि. सिंधुदुर्ग - ४१६०१.

: **प्रा. रूपाली अशोक कांबळे**
मराठी विभाग, सतीश प्रधान ज्ञानसाधना कॉलेज, ठाणे.

: **डॉ. सुशीलप्रकाश चिमोरे**
मराठी विभाग प्रमुख,
श्री. हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर, जि-लातूर.

**मे २०२२, प्रथम मुद्रण, ISBN: 978-93-95130-02-8**

**प्रकाशक**
संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०००९८.

**अक्षरजुळणी**
मुंबई विद्यापीठ मुद्रणालय,
सांताक्रुझ, मुंबई.

# अनुक्रमणिका


| घटक क्र. | पाठाचे नाव | पान नं. |
|---|---|---|
| १. | भाषा शास्त्राच्या विविध शाखा | १ |
| २. | स्वनिमविन्यास | १४ |
| ३. | रूपिमविन्यास | २६ |
| ४. | अर्थविन्यास | ३९ |


*****

## अभ्यासपत्रिका क्र. ७
## भाषाविज्ञान
## सत्र - ५ वे श्रेयांकने -४ व्याख्याने -६०

*उदिष्टे (Objective)*

*१) भाषेचे स्वरूप आणि तिचे कार्य जाणून घेणे*

*२) भाषाभ्यासाच्या विविध अंगांचा परिचय करून घेणे*

३) भाषेच्या अभ्यासाच्या आधुनिक व शास्त्रीय पध्दतीचा परिचय करुन घेणे तसेच पारंपारिकऐतिहासिक अभ्यासपध्दतीपेक्षा तिचे वेगळेपण समजून घेणे.

**घटक-१ भाषाशास्त्राच्या विविध शाखा– वर्णनात्मक, ऐतिहासिक व समाजशास्त्रीय.**

**घटक -२ स्वनिम विन्यास (स्वन, स्वनिम, स्वनांतर, स्वनिमांचे प्रकार, स्वनिम विश्लेषणाची तत्त्वे – तंत्रे.**

**घटक -३ रूपिमविन्यास– रूपिका, रुपिम, रुपिकांतर, रुपिमांचे प्रकार, रुपिम प्रकिया.**

**घटक – ४ अर्थविन्यास – भाषिक अर्थाचे स्वरूप, शब्दार्थाचे प्रकार, अर्थ आणि त्याचे परस्पर संबंध**

### सत्रान्त परीक्षा ( गुण १००)

प्रश्न १. घटक १ वर आधारित प्रश्न ( पर्यायासह) गुण २०
प्रश्न २. घटक २ वर आधारित प्रश्न ( पर्यायासह) गुण २०
प्रश्न ३. घटक ३ वर आधारित प्रश्न ( पर्यायासह) गुण २०
प्रश्न ४. घटक ४ वर आधारित प्रश्न (पर्यायासह ) गुण २०
प्रश्न ५. सर्व घटकांवर आधारित दोन टीपा (पर्यायासह ) गुण २०

***साध्ये (Outcome)***

1) ***भाषेच्या विविध अंगांचा परिचय होईल***
2) ***भाषेच्या अभ्यासाच्या आधुनिक व शास्त्रीय पद्धतीचा परिचय होईल***

**संदर्भ ग्रंथ-**

१) काळे, कल्याण व इतर (संपा.), आधुनिक भाषाविज्ञान (संरचनावादी, सामान्य आणि सामाजिक, प्रतिमा प्रकाशन, पुणे, (दु.आ.) २००३.
२) काळे कल्याण व इतर (संपा.), वर्णनात्मक भाषाविज्ञान स्वरूप आणि पद्धती, गोखले एज्युकेशन सोसायटी, नाशिक, १९८२.

३) गजेंद्रगडकर, श्री. न., भाषा आणि भाषाशास्त्र, व्हीनस प्रकाशन. पुणे, (दु. आ.) १९७९.
४) गोविलकर लीला, वर्णनात्मक भाषाविज्ञान, आरती प्रकाशन, डोंबिवली, १९९२.
५) घोंगडे, रमेश, सामाजिक भाषाविज्ञान दिलीपराज प्रकाशन पुणे, २०१२.
६) पुंडे, द. दि., सुलभ भाषाविज्ञान, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे,२००५
७) मालशे, स. गं. व इतर(संपा.), भाषाविज्ञानः ऐतिहासिक व वर्णनात्मक, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००५ (ति. आ.)
८) मालशे, स.गं. व इतर (संपा.),भाषाविज्ञान परिचय, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००५ (दु.आ)
९) गायकवाड संपत, दलित आत्मकथन : भाषिक समाज, भाषा आणि भाषा व्यवहार, प्रज्ञा प्रबोध प्रकाशन, सांगली २०१२ .
१०) मराठी भाषेचा भाषावैज्ञानिक अभ्यास : मठकर अलका, शब्दालय प्रकाशन २०१५

# १

## भाषा शास्त्राच्या विविध शाखा

**घटक रचना**

१.१ उद्देश

१.२ प्रस्तावना

१.३ ऐतिहासिक भाषाविज्ञान : तत्त्व व स्वरूप

१.४ वर्णनात्मक भाषाविज्ञानाची मूलतत्त्वे

१.५ समाजभाषाविज्ञानाचे स्वरूप:

१.६ समारोप

१.७ स्वाध्याय

१.८ संदर्भग्रंथसूची

## १.१ उद्देश

१. विद्यार्थ्यांना भाषाभ्यासाची ओळख होईल.

२. विद्यार्थी भाषेचा अभ्यास करण्याची विविध प्रकारचा अभ्यास करतील.

३. ऐतिहासिक भाषा विज्ञानाची ओळख होईल.

४. वर्णनात्मक भाषा विज्ञानाची मूलतत्त्वे समजतील.

५. समाज भाष्य विज्ञानाचे स्वरूप समजुन येईल.

## १.२ प्रस्तावना

आधुनिक काळात भाषाभ्यासाच्या विविध पद्धती उदयाला आलेल्या दिसतात. वेगवेगळ्या भाषा तज्ज्ञांनी मांडलेल्या भाषेसंबंधीच्या विचारांतून आणि विवेचनातून भाषेकडे पाहण्याचे हे दृष्टिकोण विकसित झाले आहेत. भाषेला इतिहास असतो. तसेच जन्म, विकास आणि मृत्यू कल्पनेनुसार भाषेच्या उगमाचा, विकासाचा, परिवर्तनाचा विचार करता येतो. या विचारांतून ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीचा उदय झाला. त्यातून भाषेच्या (उगमापासून) आधुनिक कालखंडापर्यंतच्या भाषिक परिवर्तनाचा शोध घेतला जाऊ लागला. पुढे ऐतिहासिक भाषाभ्यासाच्या मर्यादा स्पष्ट होऊ लागल्या. साधनांच्या उपलब्धतेमध्ये अनेक समस्या निर्माण होऊ लागल्या. भाषेकडे नियामक दृष्टिकोनातून पाहण्याचे कोणते धोके आहेत, याची नवी मांडणी होऊ लागली. भाषेचा इतिहास तपासण्यापेक्षा भाषेच्या वर्तमानकालीन रूपांचा शोध घेणे उचित मानले जाऊ लागले. या विचारातून वर्णनात्मक भाषाभ्यास पद्धतीचा उदय झाला. या अभ्यासपद्धतीचा प्रभाव भाषाभ्यासावर दीर्घकाळ पडलेला दिसतो. किंबहुना भाषेव्यतिरिक्त अन्य अभ्यासशाखावरही वर्णनात्मक, संरचनावादी विचारांचा प्रभाव पडला. अलीकडच्या काळात भाषेकडे सामाजिक

सापेक्षतेच्या दृष्टिकोनातून पाहिले जाऊ लागले. त्यातून समाजभाषाविज्ञानाची शाखा विकसित झाली. याशिवाय तौलनिक भाषाभ्यास, मनोविश्लेषणात्मक भाषाभ्यास, भौगोलिक भाषाभ्यास इत्यादि अशा अनेक अभ्यासपद्धती भाषेच्या अभ्यासासाठी योजल्या जातात. तथापि प्रस्तुत विवेचनात आपण ऐतिहासिक भाषाविज्ञान, वर्णनात्मक भाषाविज्ञान आणि समाजभाषाविज्ञान या अभ्यासशाखांचा विचार करणार आहोत.

## १.३ ऐतिहासिक भाषाविज्ञान : तत्त्व व स्वरूप

भाषेच्या भूतकालीन रूपांचा शोध घेणे, भाषेचा इतिहास शोधून काढणे म्हणजे ऐतिहासिक भाषाविज्ञान होय. देश, मानवी वंश, साहित्य किंवा कोणताही कलाव्यवहार यांना जसा इतिहास असतो, तसा भाषेलाही इतिहास असतो. प्रवाहीत्व हे नैसर्गिक तत्त्व भाषेलाही लागू पडते.काळानुसार भाषा बदलत जाते. या परिवर्तनामागे निश्चित असे कोणतेतरी तत्त्व असते असे भाषाभ्यासकांचे मत आहे. ऐतिहासिक अभ्यासपद्धतीचा पाया रचण्याचे श्रेय सर विल्यम जोन्स यांना दिले जाते.

सर विल्यम जोन्स यांनी इ.स. १७८६ मध्ये कलकत्ता येथे भरलेल्या एशियाटिक सोसायटीच्या वार्षिक अधिवेशनात निबंध वाचताना असे महत्त्वाचे विधान केले की, “संस्कृत, ग्रीक, लॅटिन या भाषांत जे साम्य आढळते ते इतके घनिष्ट व खोलवर रुजलेले आहे की, त्या साम्याचा खुलासा ते केवळ यादृच्छिकतेने (योगायोगाने) घडून आले आहे. असे म्हणून भागण्यासारखे नाही. त्या साम्याचा खुलासा करण्यासाठी ही साम्यस्थळे असणाऱ्या भाषा कोणत्यातरी एका भाषेपासून उद्भवलेल्या असल्या पाहिजेत, असे मानावे लागते आणि ही जी संस्कृत इत्यादी भाषांच्या मुळाशी असलेली भाषा मानावी लागते ती आज आपणास बहुदा उपलब्ध नाही.” या विधानामुळे भाषेच्या अभ्यासकांना भाषा संशोधनाची नवी दिशा प्राप्त झाली. म्हणून सर विल्यम जोन्स यांनी वरील विधानाने ऐतिहासिक भाषाविज्ञानाचा पाया रचला असे म्हटले जाते. सर विल्यम जोन्स यांच्या विचारातून १८व्या व १९ व्या शतकात ऐतिहासिक आणि तौलनिक भाषाविज्ञान या दोन अभ्यासशाखामध्ये बरेच संशोधन झाले.

भाषेचा इतिहास शोधताना भाषेच्या भूतकालीन अवस्थांचा शोध घेत, भूतकाळात भाषा कशी बदलत गेली. तसेच भूतकाळापासून वर्तमान काळापर्यंत भाषेत कोणकोणते बदल होत आले आहेत, याचा अभ्यास अभिप्रेत आहे. हे करीत असताना भूतकाळात मागेमागे जाताना भाषेच्या पूर्वावस्थेचा शोध घेणे क्रमप्राप्त असते. मराठी भाषेच्या संदर्भात विचार करता मराठीची प्राचीन अवस्था, मध्ययुगीन मराठी, अर्वाचीन मराठी यातील भाषेच्या अवस्थांचा शोध घेता येतो. तसा आज ज्ञात असलेल्या अवस्थेपासून भाषेच्या भूतकालीन अज्ञात अवस्थेपर्यंत मागे जात अभ्यास करता येतो.

**ऐतिहासिक भाषाभ्यासाच्या दोन पद्धती:**

ऐतिहासिक भाषा विज्ञानाचा अभ्यास  दोनपद्धतीने करता येतो.

**१) पुरोगामी पद्धती:**

भाषेच्या ज्ञात असलेल्या अवस्थेपासून तिचा उत्तरोत्तर, नंतरच्या म्हणजे अलीकडच्या अवस्थांचा विकास कसा कसा होत गेला याचा अभ्यास करणे,ही पुरोगामी पद्धती होय. जसे की संस्कृत–प्राकृत - अपभ्रंश – मराठी.

**२) पश्चादगामी पद्धती:**

भाषेचा ज्ञात व्यवस्थेकडून तिच्या मागील अवस्थेचा शोध घेत मागेमागे जाणे, म्हणजे भूतकालीन अवस्थेचा शोध घेत जाणे. हिला पश्चादगामीपद्धती म्हणतात.जेथे भाषेची पूर्वावस्था माहीत नसेल तिथे पुनर्रचन करणे हा पर्याय स्वीकारला जातो. जसे की मराठी – अपभ्रंश– प्राकृत - संस्कृत– वैदिकसंस्कृत - इंडोआर्यन - इंडोइरानियन - इंडो-युरोपियन. या ज्ञात अवस्थानंतर भाषेचे पुनर्रचन करावे लागते. ऐतिहासिक भाषाविज्ञानात जेव्हा भाषेची पूर्वावस्था माहीत नसते तेव्हा पुनर्रचन करून भाषेच्या स्वरूपाचा अंदाज केला जातो. हे पुनर्रचनकरण्याच्या दोन पद्धती आहेत.

**१) तौलनिक किंवा बहुभाषिक पुनर्रचन:**

भाषेतील ध्वनी परिवर्तने ही नियमानुसार घडणारी असतात या गृहितकावर वर हे पुनर्रचना आधारलेले आहे. एकाच भाषाकुलातील भाषामधील आंतरिक पुरावे शोधत मागे मागे जात मूळ भाषेचे पुनर्रचना करणे अपेक्षित असते. दोन भाषांमध्ये आढळणाऱ्या साम्याच्या आधारे त्या भाषा एकाच भाषाकुलातील असाव्यात असे मानले जाते. त्या भाषांची जननीभाषा शोधून काढणे, हे ऐतिहासिक भाषाविज्ञानाचे प्रमुख लक्षण असते. त्यासाठी पुनर्रचन केले जाते संस्कृत, अवेस्ता, ग्रीक, लॅटिन या भाषातील शब्दांच्या साम्यावरून मूळ इंडो-युरोपियन भाषेची पुनर्रचना करायचे किंवा भाषेचा पूर्वावस्थेचा अंदाज करायचा, अशी ही पद्धत आहे. संस्कृत आणि अवेस्ता या भाषेत सात या अर्थाचे 'सप्त' आणि 'हप्त' अशी रूपे मिळतात. लॅटिन भाषेत 'सेप्तम्' असे रूप मिळते. म्हणून इंडो-युरोपियन भाषेत'स' हेच पूर्वरूप ठरते.

**२) अंतर्गत अथवा एक भाषिक पुनर्रचन:**

भाषेच्या इतिहासातील ध्वनिपरिवर्तन ही सापेक्ष असतात, या गृहितकावर आधारलेले हे पुनर्रचन आहे. 'मरूत' या संस्कृत शब्दाच्या विभक्तिरूपात कधी 'त्'तर कधी 'द्' या दोन ध्वनींची आंदोलने आढळतात. तसेच मराठीत 'ससा' या शब्दाचे अनेक वचन 'ससे' असे होते. पण त्यांना विभक्ती प्रत्यय लागला की 'सशाला' असे सामान्य रूप होते. मासा- माशांना, वासा- वाशांना अशी रूपे पहावयास मिळतात. त्यामुळे मासे, ससे ही पूर्वरूपे होत. तर माशे, सशे ही उत्तररूपे ठरतात. अशाप्रकारे उत्तरोत्तर अवस्थेकडे जाणे व पूर्वावस्था अज्ञात असेल तर तिची पुनर्रचना करणे, ही ऐतिहासिक भाषाभ्यासाची पश्चादगामी पद्धती होय. तिचा अवलंब दोन्ही पुनर्रचन पद्धतीत केला जातो.

ऐतिहासिक भाषाभ्यास हा ऐतिहासिक साधनसामग्रीच्या आधारे केला जातो. त्यासाठी शिलालेख, ताम्रपट, विटावर कोरलेले शब्द, ग्रंथ, हस्तलिखिते, भूर्जपत्रे, ताडपत्रे, नाणी, मुद्रा, ग्रंथांचा संहिता, पत्रे, रोजनिशी, तवारीखा, टिपणे, याद्या, सनदा इत्यादी साधनांचा आधार घ्यावा लागतो. मात्र जेथे ही साधने उपलब्ध नसतात, तेव्हा उत्खननहनही केले जाते मात्र. तसे करूनही भाषेची पूर्वावस्था नेमकी कशी होती हे सांगता येत नाही.

**ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीच्या मर्यादा:**

ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धती अठराव्या शतकात उदयाला आली.एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात या अभ्यासपद्धतीमध्ये काही अंतर्विरोध निर्माण झालेले दिसतात. तसेच या अभ्यासपद्धतीच्या मर्यादा स्पष्ट होऊ लागल्यामुळे नंतरच्या भाषा संशोधकांनी तिच्यावर आक्षेप घेतले. विशिष्ट सामाजिक परिस्थितीमुळे काळाच्या ओघात काही भाषा नष्ट होतात, तर काही भाषा प्रभावी ठरतात, नव्याने उदयाला येतात. जुन्या भाषेतील जन्यजनक संबंध शोधताना भाषेच्या पूर्वावस्थेचे स्वरूप नक्की सांगता येत नाही. आधीच्या काळात भाषा कोणत्या स्वरूपात बोलली जात होती, याचे नेमके पुरावे सापडत नाहीत. ऐतिहासिक भाषा विज्ञानाची साधने दुर्मिळ असणे, हा एक मोठा अडथळा या अभ्यास पद्धतीमध्ये येतो. एका भाषेपासून अनेक भाषा निर्माण झाल्या, असे मानले तरी मूळ भाषा कशी निर्माण झाली, तिची काय अवस्था होती, याचा अंदाज करणे अशक्यप्राय ठरते. भाषाकुलातील जन्यजनक संबंधाचा शोध घेताना जसे जसे भूतकाळाकडे आपण सरकतो, तसतशी भाषांची संख्या कमी होणे अपेक्षित असते, पण ती वाढत जाताना दिसते. भाषाकुळ ही संकल्पना मानवी कुळाइतकी सुलभ नसते, तर ती जटिल आणि गुंतागुंतीची असते. काहीवेळा लिखित पुरावा असतो पण तो विश्वसनीय असणे, त्यांचे ध्वनीमूल्य ठरवणे, लिखित पुराव्याच्या आधारे भाषेच्या मौखिक स्वरूपाचा अंदाज करणे, हे अवघड होऊन बसते.स्वन परिवर्तनाची प्रक्रिया घडून गेल्यानंतर प्रत्यक्ष निरीक्षणासाठी तिचे पूर्वरूप उपलब्ध होऊ शकत नाहीत. त्यामुळे स्वन परिवर्तनाचे भाषेवर घडणारे परिणाम हेच भाषेचे पूर्व साधन ठरते. हा आदान आणि सादृश्यता या स्वन परिवर्तनाच्या नियमाला बाधक ठरतात. त्यामुळे कधीकधी भाषेतील साम्य शोधणे अवघड होऊन बसते. पूर्वीच्या बोलीमध्ये बोलीभेद नव्हते असे, गृहीत धरून भाषेची पूर्व प्रतिमाने बनवावी लागतात. त्यामुळे भाषेच्या वास्तवतेला धक्का पोहोचतो.अशा अनेक मर्यादा ऐतिहासिक भाषा विज्ञानाविषयी सांगितल्या जातात.

**भाषाकुल संकल्पना:**

जगातील ज्या विविध भाषांमध्ये काही शब्दांमध्ये उच्चार साम्य आढळते. अशा भाषा एकाच कुळातील असाव्यात असे ऐतिहासिक भाषा वैज्ञानिकांचे म्हणणे आहे. त्यातून भाषेचे कुलनिष्ट वर्गीकरणाला प्रारंभ झालेला दिसतो. भाषेच्या इतिहासाचा अभ्यास करणाऱ्या संशोधकांनी भाषेची विविध कुळे सांगितली. एका भाषेपासून दुसरी भाषा उत्पन्न झाली असावी किंवा पहिली भाषा दुसऱ्या भाषेत रुपांतरीत झाली असावी, यातून आणि भाषेतील जन्यजनक संबंध शोधण्यातून भाषाकुळ ही संकल्पना मांडण्यात आली. संस्कृत, लॅटिन, फार्सी, इंग्रजी, जर्मनी या भाषांमधून काही साम्य आढळते, या सामन्याच्या आधारे या भाषा एकाच भाषाकुलातील असाव्यात, असे संशोधकांचे मत आहे. संस्कृत- पितृ, लॅटिन- पातेर, फारसी- पिदर, इंग्रजी- फादर, जर्मन - फातेर किंवा माता, माय, मा मदर किंवा भ्राता, भाई, भाऊ, ब्रदर, या ध्वनिसाम्याच्या जोड्या पाहिलयास संस्कृत, इंग्रजी, हिंदी, मराठी या भाषांत काही ध्वनीसाम्य असलेले शब्द दिसतात. युरोपियन भाषाकुळ, द्राविडी भाषाकुळ, हेमिटो सेमिटिक भाषाकुळ, ऑस्ट्रॅा-एशियायी भाषाकुळ इत्यादी भाषाकुळे मानली गेली आहेत. जगातल्या विविध भाषा भाषाकुळांमधून विभागण्याचे प्रयत्न संशोधकानी केलेले दिसतात.

मराठी भाषा ही इंडोयूरोपियन भाषाकुळातील भाषा आहे. इंडो-युरोपियन भाषेच्या इराणी शाखेत मराठीचा समावेश केला जातो. आर्य भारतीय भाषामध्ये नंतरच्या काळात संस्कृत-प्राकृत आणि त्यांचे अपभ्रंश यातून निर्माण झालेल्या उत्तर भारतातल्या हिंदी, मराठी, गुजराती, बंगाली या भाषा आणि इराण प्रांतातील अवेस्ता, पर्शियन, पुश्तु, बलुची, पहलवी इत्यादी भाषांमधून बरेच साम्य असलेले दिसते. त्यामुळे या भाषांचे एक कुळ मानण्यात आलेले आहे. ऐतिहासिक भाषाविज्ञानात भाषाकुळ संकल्पना महत्त्वाची मानली गेली.

## १.४ वर्णनात्मक भाषाविज्ञानाची मूलतत्त्वे

वर्णनात्मक भाषाविज्ञान ही भाषाभ्यासाची शाखा एकोणिसाव्या शतकात उदयाला आली. एखाद्या भाषेचे वर्णन करणे, हा या अभ्यास पद्धतीचा प्रधान हेतू आहे. भाषेकडे पाहण्याच्या पारंपरिक संकेत विचारांना वर्णनात्मक भाषाभ्यासाने छेद दिलेला दिसतो. कोणतीही भाषा श्रेष्ठ व कोणतीतरी भाषा कनिष्ठ असते किंवा भाषेत शुद्ध आणि अशुद्ध असे काही असते, हे वर्णनात्मक भाषा अभ्यासाने नाकारले आहे. प्रबळ किंवा अभिजनांची भाषा ही श्रेष्ठ, उच्च दर्जाची आणि दुर्बल गटांची भाषा ही कनिष्ठ दर्जाची असते. या समजुतीला वर्णनात्मक अभ्यास पद्धतीने तीव्र विरोध केला. तसेच भाषेचे व्याकरण अभ्यासणे म्हणजेच भाषेचा अभ्यास यालाही वर्णनात्मक भाषाभ्यास नकार देताना दिसते.

भाषा एक प्रवाही सामाजिक संस्था असते. ती कोणत्या तरी एका कालबिंदूपाशी स्थिर असते, असे म्हणून तिचा वस्तुनिष्ठ अभ्यास करणे हेच तर्कनिष्ठ आहे, असे वर्णनात्मक भाषाविज्ञान मानते.

**वर्णनात्मक भाषाविज्ञानाचे स्वरूप:**

वर्णनात्मक अभ्यास पद्धतीचा पाया रचण्याचे श्रेय फेर्दिनां दी सोसूरला दिले जाते. त्याने भाषेविषयीची काही मूलभूत तत्त्वे सांगितली, त्यातून ही अभ्यासपद्धती विकसित होत गेलेली दिसते. भाषेमध्ये कधीही उत्क्रांती होत नाही, तर फक्त परिवर्तन होते आणि हे परिवर्तन अतिशय संथ गतीने होते, असे प्रतिपादन सोसूरने केले. त्याने काही महत्त्वाच्या संकल्पना मधले भेद उलगडून दाखवले. यातूनच त्यांनी या अभ्यासपद्धतीचा पाया रचला, असे म्हणता येईल.

१. भाषिक व्यवस्था आणि भाषिक वर्तन(LangueandParole)

२. एककालिक आणि कालक्रमिक (Synchronic and Diachronic)

३. चिन्हक आणि चिन्हित (Signifier and Signified)

४. अन्वयनिष्ठ आणि गणनिष्ठ(Syntagmaticand Paradigmatic)

**भाषिक व्यवस्था आणि भाषिक वर्तन:**

दोन व्यक्तींच्या संभाषणामध्ये व एकाच व्यक्तीच्या वेगवेगळ्या संभाषणामध्ये आपल्याला विविधता दिसून येते. तरीही या संभाषणातून संप्रेक्षण घडून येते. कारण त्याच्या मुळाशी

लांग म्हणजे भाषिक नियमव्यवस्था असते.ती नियमव्यवस्था स्थिर असल्यामुळे व्यक्ती व्यक्तीनुसार आणि प्रसंगानुसार बदलणाऱ्या संभाषणाचे आकलन होते.

ही भाषिक व्यवस्था समग्र भाषेच्या मुळाशी असते. माणूस प्रत्यक्ष जे संभाषण करतो त्याला भाषिक वर्तन असे म्हटले आहे.  हे भाषिक वर्तन म्हणजे प्रत्यक्ष बोलणे. भाषिक व्यवस्था ही समग्र समाजाची, संस्कृतीची निर्मिती असते. उलट भाषिक वर्तन हे व्यक्तीचे असते. व्यक्तीच्या प्रकृतीनुसार ते प्रगट होते आणि ते  आकलनसुलभ असते.

**एक कालिक आणि कालक्रमिक:**

एककालिक आणि कालक्रमिक या भाषा विज्ञानाच्या दोन शाखा आहेत. कालक्रमिक म्हणजे ऐतिहासिक भाषाभ्यास म्हणजे भाषाविज्ञान नव्हे, असे मत सोसूरने हिरीरीने मांडले. त्याच्या काळात कालक्रमिक अभ्यासाचे प्राबल्य होते. पण त्याच्या मर्यादा स्पष्टपणे जाणवल्यामुळे सोसूरने एककालिक अभ्यासपद्धती मांडली तिलाच वर्णनात्मक अभ्यास पद्धती, असेही म्हटले जाते. कोणत्याही एका बिंदूपाशी भाषा स्थिर आहे, असे मानून विविध भाषिक घटकांची समग्र व्यवस्था तपासायला हवी. याचा आग्रह त्यांनी वर्णनात्मक भाषाभ्यासामध्ये धरला. म्हणून एककालिक अभ्यासपद्धती हीच महत्त्वाची अभ्यासपद्धती आहे असे सोसूरनेअसे म्हणणे आहे.

**चिन्हक आणि चिन्हित:**

भाषेची संरचना कशी होते, हे समजण्यासाठी सोसूरने सांगितलेल्या चिन्हांची संकल्पना समजून घेणे अत्यावश्यक आहे. भाषा ही चिन्हांचे बनलेली असते. हे सांगताना त्यांनी 'चिन्हक' आणि 'चिन्हित' या संकल्पना सांगितले आहेत. चिन्हांचे हे दोन भाग असतात. चिन्ह म्हणजे  भाषेत वापरले जाणारे ध्वनी आणि चिन्हित म्हणजे प्राप्त झालेला अर्थ. हे स्पष्ट करण्यासाठी त्यांनी कागदाच्या प्रतिमेचे उदाहरण दिले आहे. कागद हा एका बाजूने बनलेला नसतो, तर तो दोन बाजूंनी मूर्त होत असतो. त्याच प्रमाणे भाषेतील चिन्हे ध्वनी आणि अर्थ याशिवाय सिद्ध होत नाहीत. पारंपरिक विचारातील शब्द आणि त्याचा अर्थ यालाच सोसूर'चिन्हक' आणि 'चिन्हित' असे म्हणतो.  सोसूरच्या या विचारांमुळे वर्णनात्मक भाषा अभ्यासाला 'चिन्हमीमांसा'असेही म्हटले जाते.

**अन्वयनिष्ठ आणि गणनिष्ठ:**

भाषिक चिन्हांची अपरिवर्तनीयताही भाषिक चिन्हांवर अवलंबून असते. भाषेतील चिन्हेही भाषा व्यवस्थेत परस्परांशी विरोधसंबंधाने निगडित असतात. जे चिन्ह प्रत्यक्षात असते त्याची सांगड उपस्थित असलेल्या प्रत्यक्ष चिन्हाशी घालता येते. म्हणजेच 'कावळा' असे म्हटले की मोर, घुबड, चिमणी इत्यादि अन्य चिन्हांशी त्यांचे वैधर्म्ययुक्त  नाते सिद्ध करता येते.

कोणत्या चिन्हानंतर कोणते चिन्ह येते, हे भाषेतील दोन प्रकारच्या परस्पर संबंधावर अवलंबून असते. एक संबंध क्रमिक असतो. त्यातून जो घटक तयार होतो त्याला अन्वयनिष्ठ संबंध असे म्हणतात. दुसरा संबंध चिन्हांच्या अर्थाच्या आधारावर निश्चित होतो. भाषेतील ही संरचना उभ्या आणि आडव्या अक्षाच्या आधारे स्पष्ट करता येईल.

या मांडणीतून वाक्याची संरचना करता येते.

| | | |
|---|---|---|
| सीमा | देवळात | गेला |
| किशोर | रानात | जातो |
| बापट | गावाला | चरते |
| गाय | बाजाराला | गेले |
| राघव | कार्यालया | जाते |
| | | जातो |

**लेनर्ड ब्लुमफील्ड:**

वर्णनात्मक भाषाविज्ञानात अमेरिकन संरचनावादी लेनर्ड ब्लुमफील्ड यांनी महत्त्वाची भर घातली आहे. भाषा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे कशी संक्रमित होते याविषयी ब्लुमफील्डनी आपली भूमिका मांडली आहे. त्यांच्या मते माणूस आनुवंशिकतेने भाषा शिकत नाही. सामाजिक सांस्कृतिक माध्यमातर्फे भाषा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत असते. व्यक्तीचे बोलणे ती कोणत्या जातीत जन्मली, वंशात जन्माला आली यावर अवलंबून नसून ही कोणत्या समाजात वाढली, तिच्यावर कोणत्या समाजाचे संस्कार झालेत यावर अवलंबून असते. प्राण्यांची संदेश व्यवस्था ही जैविक असते. ती आनुवंशिकतेने येत असते. पण मानवी भाषा ही सांस्कृतिक असते, असा निष्कर्ष अमेरिकन संरचनावादी विचारवंतांनी मांडला.

ब्लुमफील्ड यांनी व्यक्ती-व्यक्तीच्या भाषिक प्रयोगापासून अमूर्त अशी भाषिक संरचना वेगळी काढण्याचे प्रयत्न केले. त्यासाठी त्यांनी 'वाचिक कृती' ही संकल्पना मांडली. मानसशास्त्रातील वर्तनवादाचा आधार घेत ज्ञान म्हणजे 'चेतक' आणि 'प्रतिसाद' यातील संबंध होय, असे म्हटले. एखाद्या व्यक्तीला भूक लागली आणि त्याला फळ खाण्याची इच्छा झाली तर तो फळ हस्तगत करेल किंवा आपल्या सोबतीच्या माणसाला ते देण्यासाठी चेतना देईल. समोरच्या व्यक्तीने फळ आणून दिले, तर त्यास प्रतिसाद असे म्हणता येईल. चेतक आणि प्रतिसाद यांच्यामध्ये भाषा असते. त्यामागे वाचिक वर्तन असते असे ब्लुमफील्डनी म्हटले आहे.

**नोम चॉम्स्की:**

अमेरिकन संरचनावादी भाषावैज्ञानिकांच्या अनुभववादी शोधपद्धतीतील उणिवा चॉम्स्की यांनी उघड केल्या. प्रत्येक भाषेची रचना अनन्य असते, हे चॉम्स्कीला मान्य नाही. तो भाषेचा विचार अमूर्त पातळीवर करू पाहतो. चॉम्स्की यांच्यामते भाषा म्हणजे 'वाचिक वर्तन' नसून 'भाषिक ज्ञान व क्षमता' होय. माणसाकडे असलेली भाषिक ज्ञानक्षमता कोणत्याही भाषेतील व्यवहाराला कारणीभूत ठरत असते. अशी भाषिक ज्ञानक्षमतेची संकल्पना नोम चॉम्स्की यांनी मांडली. या भाषिक क्षमतेच्या आधारेच माणूस भाषा उपयोजित असतो. भाषेत निर्मितीशीलता हा गुणधर्म असतो. त्यामुळे एका व्यक्तीचे संभाषण आकलन करून घेणे, दुसऱ्या व्यक्तीला शक्य होते. भाषेची निर्मितीशीलता म्हणजे भाषेची

नियमव्यवस्था, ही निर्मितीशील असते. भाषा आत्मसात करणे म्हणजे ती निर्मितीशीलता आत्मसात करणे होय. प्रत्यक्ष भाषिक वर्तनाला चॉम्स्कीने भाषिकप्रयोग असे म्हटले आहे. या प्रयोगामागील नियमव्यवस्थेचे ज्ञान होणे, यालाच चॉम्स्की भाषिकक्षमता असे म्हणतात.

## १.५ समाजभाषाविज्ञानाचे स्वरूप

समाजभाषाविज्ञान ही १९६०नंतर उदयाला आलेली अभ्यास शाखा आहे. मानववंशशास्त्र आणि समाज विज्ञान यांच्या अभ्यासशाखातील पद्धतींचा आधार घेऊन हा अभ्यास केला जातो. व्यक्तीचे वय, सामाजिक स्तर, वर्तनव्यवहार, भाषिक सवयी,बोली यानुसार कसे विकल्प बदल घडते. याचा समाजसापेक्ष विचार समाजभाषाविज्ञान करते. मराठी भाषेत 'तू','तुम्ही','आपण' हे केवळ भाषिक विकल्पन नसून सामाजिक संकेतानुसार होणारे समाजविषयक विकल्पन आहे.(पृ,१७) मोठ्या किंवा महनीय व्यक्तीविषयी आदर व्यक्त करताना आपण 'आपण' किंवा 'तुम्ही' या आदरार्थी बहुवचनाचा वापर करतो. यामागे विशिष्ट सामाजिक संकेत आहेत. मोठ्या व्यक्तिविषयी आदराची भूमिका असते. भाषाभिव्यक्तीमागे असे सामाजिक संकेत असतात. त्यामुळे समाजात भाषा व्यवहार हे व्याकरणाच्या नियमानुसार चालत नसून, ते सामाजिक संरचना सामाजिक संकेत व्यक्तीव्यक्ती संबंधानुसार चालतात, हे समाजभाषाविज्ञानाने सिद्ध केले आहे.

रमेश वरखेडे यांनी सामाजिक भाषाविज्ञानाची व्याख्या करताना असे म्हटले आहे की, "समाजविज्ञान व मानववंशशास्त्र यांच्या सहाय्याने भाषेच्या अभ्यासात करण्याच्या प्रणालीला भाषेचे समाजविज्ञान म्हणतात" (पृ.१७)समाजभाषाविज्ञानात कुटुंब, जाती, वर्गव्यवस्था, लिंगभेद, व्यवसायभेद यानुसार भाषेचा अभ्यास केला जातो. मध्यम वर्ग, कनिष्ठ वर्ग आणि उच्च वर्ग यानुसारही भाषेत कसे भेद होत जातात, त्याचाही अभ्यास भाषाविज्ञानाच्या कक्षेत येतो. म्हणून समाजभाषाविज्ञान ही भाषा विज्ञानाची महत्त्वपूर्ण शाखा आहे.

**समाजभाषाविज्ञानाचे सिद्धांत:**

समाजभाषाविज्ञानाची संकल्पना एडवर्ड् सपीर (१४४४ – १९३९) आणि त्याचा सहकारी बेंजामिन ली वोर्फयानी मांडलेल्या भाषिक सापेक्षतावादाच्या सिद्धांतामधून विकसित झालेली दिसते. या दोन संशोधकांनी भाषा आणि संस्कृतीच्याआंतरसंबंधाचा अभ्यास करून भाषिक सापेक्षतावादाचा सिद्धान्त मांडला. सपिरच्या मते "माणूस भाषेच्या आधारे संपूर्ण जगाला सामोरा जात असतो. वास्तव जगाची प्रतिमा तो आपल्या मेंदूत भाषेच्या आधारे उभी करत असतो. या प्रतिमेच्या आधारेच तो जाणिवेच्या पातळीवरील भाषिक व्यवहार करीत असतो. कोणताही मानवी अनुभव केवळ भौतिकविश्वाशी निगडित नसतो, तर व्यक्तीच्या भाषिक उपयोजनाशी निगडित असतो. म्हणून माणसाच्या अनुभवविश्वावर लिंग, विभक्ती, काळ, संख्या इत्यादी मापनवाचक शब्दांची सत्ता चालत असते. म्हणजे व्यक्तीच्या जाणीव-नेणीवेतील जग हे 'भौतिक' नसून 'भाषिक' असते. असा दावा सपिर यांनी केला आहे. समाजाच्या भाषिक  सवयी यांनी माणसाचा जीवनविषयक दृष्टिकोन नियंत्रित होत असतो. कोणत्याही समाजाची जडणघडण त्या समाजाच्या भाषिक

जडणघडणीवर आधारलेली असते यालाच भाषिक सापेक्षतावाद असे म्हटले जाते" (समा. भाषा,पृ.१९ )

बेंजामिन वोर्फ यानेही शब्दांनीच भाषेकडे पाहण्याचा दृष्टिकोन तयार होतो, असा सिद्धांत मांडला.'भरलेले''रिकामे' हे शब्दच त्या वस्तूंकडे पाहण्याची दृष्टी देत असतात. त्यामुळे भौतिक कारणामुळे ज्या गोष्टी घडतात त्यात भाषेचाही महत्त्वाचा सहभाग असतो, असे वोर्फचे म्हणणे आहे. या दोघांच्या विचारातून समाजभाषाविज्ञानाची संकल्पना आकाराला आली आहे. मातृभाषा बोलणाऱ्याच्या मनात संकल्पनांची साखळी तयार करते आणि या संकल्पनांच्या आधारे माणूस विश्वाचे ज्ञान प्राप्त करीत असतो. या दोघांनी ॲरिझोनामधील 'होपी' भाषेचा अभ्यास करून, भाषा ही व्यक्तीच्या अनुभवायला आकार देत असते, मूल्यकल्पना, अभिरूची, दृष्टिकोन या साऱ्यावर भाषेची सत्ता चालत असते.

भाषा बदलली की वास्तव बदलते, असेही त्यांनी सिद्ध केले आहे. उदाहरणार्थ मध्यमवर्गीय माणसे एकमेकांना अभिवादन करताना 'नमस्कार' हा शब्द वापरतात. तर खेडूत माणसे 'रामराम' म्हणतील.'जय भीम','जय महाराष्ट्र' इत्यादी शब्दांनी वेगवेगळ्या या दृष्टिकोनाचे, राजकीय पक्षांचे लोक एकमेकांना अभिवादन करीत असतात. त्या त्या वास्तवात ती ती भाषिक रूपे क्रियाशील असतात, असे म्हणता येईल.

**भाषिक वर्तन आणि अवकाश:**

"भाषा व्यवहाराचे विश्लेषण केवळ शब्द आणि वाक्य यांच्या संरचनेच्या अभ्यासाने पूर्ण होणार नाही. भाषिक वर्तन व परिस्थितीचा संदर्भ लक्षात घेतल्याशिवाय भाषेचा अभ्यास पूर्ण होत नाही." असे मत मॅलिनोवस्की यांनी मांडले तोही मानववंशशास्त्राच्या प्राध्यापक होता.(समा. भाषा,पृ.१९) त्यांनी पॅसिफिक समुद्रातील Trobriand या बेटातील आदिम संस्कृतीच्या भाषेचा अभ्यास केला. ती भाषा विचार व्यक्त करण्याचे साधन असण्यापेक्षा कृतीचा एक प्रकार म्हणून वापरली जात असे. मॅलिनोवस्कीच्या मते, व्यवहारातील व्यक्तींचे बोलणे केवळ भाषण नसते; तर ते भाषिक वर्तन असते. त्यातून त्याच्या इच्छा-आकांक्षा, भावभावना व्यक्त होत असतात. व्यवसायाच्या भाषेतून बऱ्याच वेळा निरर्थक वाटणारी चर्चा भावनिक बंध जोडण्याचे कार्य करते. भाषा ही मानवी वर्तनाचा एक प्रकार आहे ही भूमिका ठेऊन व भाषा व्यवहाराचा संदर्भा ध्यानी घेऊन भाषेचे वर्णन, विश्लेषण देणे सयुक्तिक होईल असा विचार मॅलिनोवस्की यांनी मांडला.

**संदेश वहनक्षमता:**

संदेशवहन करणे भाषेचे कार्य आहे. बोलणारा आणि संदेश ग्रहण करणारा यांच्यामध्ये भाषिक संप्रेषणाची प्रक्रिया घडते. दोन्ही बाजूंना शब्दातील संकेत व्यवस्थेचे ज्ञान असणे आवश्यक असते. या संकेत व्यवस्थेच्या ज्ञानाला नोअम चॉम्स्की यांनी 'भाषिक क्षमता' असे म्हटले आहे. भाषासंप्रेषण व्यवहार हा भाषिक संरचनेवर अधिष्ठित असतो. भाषिक संरचनेवर सामाजिक संरचनेचा अंमल चालतो. यातूनच डेल हाइम्स यांनी संदेशवहन क्षमतेची संकल्पना मांडली. भाषा शिकताना कोण कुणाशी कुठे कशाविषयी बोलतो त्याच्याशी संबंधित सामाजिक नियमांचे ज्ञान आवश्यक ठरते, यालाच संदेश वहनक्षमता असे म्हणतात.

**भाषिक भांडार व लघुक्षेत्रे :**

समाजभाषाविज्ञानात भाषिका भांडार आणि भाषेची लघुक्षेत्रे या संकल्पना महत्त्वाच्या आहेत. कोणत्याही समाजाचे एक भाषिक भांडार असते ते ही संकल्पना गम्पर्झ यांनी मांडली. एका विशिष्ट प्रदेशातील लोक परस्पर विनिमयासाठी ज्या भाषा किंवा बोलींचा प्रयोग करतात, या सर्वांचा मिळून एक भाषिक कोश तयार होतो. उदाहरणार्थ मुंबईत मराठी, हिंदी, गुजराती, इंग्रजी इत्यादी भाषा तसेच कोकणी, मालवणी, खानदेशी,वऱ्हाडी इत्यादी बोली वेगवेगळ्या लोकांकडून बोलल्या जातात. तसेच औद्योगिक जीवनातील अनेक शब्द या प्रदेशात वापरले जातात. यातून मुंबईचा भाषिक कोष तयार होतो. कोणत्या क्षेत्रात कोणते शब्द वापरायचे यातून भाषेची लघु क्षेत्रे सिद्ध होतात.

संकल्पनाक्षेत्रानुसार भाषिक कोशातील कोणती शब्द रूपे वापरायची हे ठरत असते. त्यामुळे त्या त्या संकल्पनाक्षेत्राचा म्हणून एक भाषानिधी असतो, त्याला लघुक्षेत्र असे म्हटले जाते. या लघुक्षेत्रात शब्दांचे अर्थ निश्चित केले जातात. भारतात एकाच शब्दाला वेगवेगळ्या क्षेत्रात वेगवेगळे अर्थ असण्याची शक्यता निर्माण होते.भाषिक समाजाच्या शब्दकोषात  भाषिक लघुक्षेत्रे कार्यरत असतात. खेळ या भाषिक लघुक्षेत्रात वेगवेगळ्या प्रकारचे हे शब्द वापरले जातात. उदाहरणार्थ क्रिकेटमध्ये धावसंख्या, गोलंदाज, फलंदाज, यष्टीरक्षक, चौकार, षटकार किंवा कबड्डी मध्ये चढाई, पकडइत्यादी शब्द वापरले जातात.

धर्मक्षेत्रांमध्ये स्वर्ग-नरक, पाप-पुण्य, तपश्चर्या, उपास, दिंडी, वारी, भक्ती, तीर्थक्षेत्र, पारायण इत्यादी शब्द वापरले जातात. वृत्तपत्राच्या भाषेत सुद्धा वैशिष्ट्यपूर्ण शब्द येतात. जसे की, लाठीमार, बडतर्फ, निलंबित, नक्षलवादी, अतिरेकी, मोर्चा, धरणे, हिंसाचार इत्यादी

थोडक्यात त्या त्या भाषिक कोशावर त्या त्या क्षेत्रातील व्यावसायिक, आर्थिक, सामाजिक स्तर यांचा प्रभाव असतो. संकल्पनाक्षेत्र बदलले की शब्दांची उच्चाररूपेही बदलतात. उदाहरणार्थ ज्याला आपण तांदूळ म्हणतो त्याला धार्मिक व्यवहारात 'अक्षता' असे म्हटले जाते. नारळाला 'श्रीफळ' म्हणतात. देवाला वाढलेल्या जेवणाला 'नैवेद्य' म्हटले जाते. हळदीला 'भंडारा' असा शब्द वापरला जातो. देवाचे पुजारी वेगवेगळ्या नावाने ओळखले जातात. स्मशान, मंदिर, घर, शाळा, न्यायालय इत्यादी वेगवेगळ्या अवकाशात वेगवेगळ्या शब्दांचा वापर केला जातो.

**भाषा आणि सामाजिक घडण:**

वेगवेगळ्या समाजाच्या भाषेत विविध शब्दांच्या वस्तूंसाठी वैशिष्ट्यपूर्ण शब्द वापरले जातात, त्यातून त्या समाजाची विशिष्ट विचारसरणी जीवनसरणी लक्षात येते. भिल्लांच्या भाषेत दारूसाठी, कोकणी, मालवणी भाषेत माशांसाठी आणि अहिराणी बोलीत शेती व प्राणिमात्रांसाठी अनेक प्रकारचे शब्द आढळतात. एस्किमो लोकांच्या भाषेत बर्फासाठी अनेक प्रकारचे शब्द आढळतात. बारीक बर्फ, कोरडा बर्फ, मऊ बर्फ इत्यादि. कोकणीत माशांच्या विविध प्रकारासाठी, खेकड्यांच्या प्रकारासाठी अनेक शब्द वापरले जात हातात. उदा. झिंगे, कोळंबी, जवला किंवा माशांसाठी बोंबील, सुरमय, बांगडा, पेडवे, कर्ली इत्यादी अनेक शब्द वापरले जातात. भिल्लांच्या बोलीत दारूसाठी १८ शब्द वापरले जातात. यावरून त्यांच्या जीवनातील मद्यप्रेम किंवा दारूचे स्थान लक्षात येते.

मानववंशशास्त्र भाषा विज्ञानात गोत्रवाचक शब्दावलीचा अभ्यास केला जातो. वेगवेगळ्या नातेसंबंधांना वेगवेगळी नावे दिली जातात. वडील, काका, मावसा, मामा अशी मराठी नावे आहेत. पण इंग्रजीत वडील सोडून इतरांना अंकल असेच म्हटले जाते.

**भाषाभेद:**

भाषेचा समाजशास्त्रीय अंगाने विचार करताना समाजातील भाषाभेदांचा विचार करावा लागतो. वय, लिंग, व्यवसाय यानुसार अनेक भाषाभेद पहावयास मिळतात. वयानुसार लहान मुलांची भाषा, तरुणांची भाषा, वृद्धांची भाषा इत्यादी भाषा भेद दिसतात. स्त्री आणि पुरुषांची भाषा लिंगभेदानुसार केली जाते. तर सोनार, सुतार, लोहार,हमाल, चर्मकार हे व्यवसायानुसार केले जाणारे भेद आहेत. कार्यालय, शासन यानुसारही अनेक प्रकारचे भाषाभेद असलेले दिसतात.

**भाषा आणि बोली:**

सामाजिक भाषाविज्ञानात बोलीविज्ञानालाही महत्त्व दिले जाते. अनौपचारिक संज्ञापन व्यवहार हा बोलीमधून होतो.  बोलीचे स्वरूप हे मौखिक असते. बोली नैसर्गिक स्वरूपात समाजात रूढ असतात बोलीना क्षेत्रीय भाषाभेद असे ही म्हटले जाते. भाषेचा प्रयोग औपचारिक संदर्भात केला जातो, तर बोली अनौपचारिक व्यवहारांसाठी वापरल्या जातात. मराठी भाषा ही संपूर्ण महाराष्ट्रात प्रमाणभाषा म्हणून वापरली गेली, तरी खानदेश, वऱ्हाड, मराठवाडा, कोकण या वेगवेगळ्या प्रदेशात बोलींचे प्राबल्य असलेले दिसते.

बोलीभूगोल ही बोलीच्या अभ्यासाची अध्यायन शाखा आहे. भौगोलिक सीमारेषा यांच्या आधारे भाषा भेदांचा अभ्यास करणे, हे या अभ्यासशाखेचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. क्षेत्रीय सर्वेक्षणाच्या आधारे भाषा बादलाचा नकाशा तयार करण्याचे काम बोलीविज्ञानात अभिप्रेत आहे. देशाच्या विशिष्ट भागामध्ये वापरल्या जाणाऱ्या बोलीचा अभ्यास या शाखेअंतर्गत केला जातो. बोलीचे उच्चार, व्याकरण, शब्दसंग्रह,म्हणी, वाक्प्रचार, संस्कृती, लोककथा, लोकगीते, लोकनाट्य यांचा अभ्यास बोली भूगोलाच्या कक्षेत येतो.  बोलीचे सामाजिक स्थान, व्यवसाय, विशिष्टता बोलीची शैली, तिची भाषिक वैशिष्ट्ये, शब्दसंग्रह यानुसार बोलीचे नमुने संकलित करून तिचे वर्णन, विश्लेषण केले जाते सामाजिक बोली विज्ञानात वर्ग व जात लिंग धर्म इत्यादींच्या मुळे कसे बदल होत जातात त्याचा अभ्यास केला जातो. मराठी भाषेच्या प्रभावक्षेत्रातमालवणी, खानदेशी, वऱ्हाडी, नागपुरी,महारी, धनगरी, भिलोरी, बंजारा, पावराइत्यादि अनेक बोली बोलल्या जातात.बोली आणि समाज यांचा घनिष्ठ संबंध असतो. तसेच दैनंदिन जीवन व्यवहाराना सक्षमपणे तोलून धरण्याची क्षमता बोलीमध्ये असते.

**व्यावसायिकांची बोली:**

समाजातील विविध व्यवसायिक भाषिक भांडारात भर घालताना दिसतात. भाषिकभांडार म्हणजे  भाषेचा शब्दकोश म्हणता येईल. किंवा भाषेत वापरल्या जाणाऱ्या विशिष्ट प्रकारच्या लाक्षणिक प्रयोगांचा संघात असेही म्हणता येईल. वेगवेगळे व्यवसाय करणारे लोक स्वतःची भाषा वापरत असतात. उदाहरणार्थ ‘सोने गडगडले’,‘चांदी भडकली’,‘कांदा पडला’ असे शब्दप्रयोग व्यवसायाच्या अनुषंगाने केले जातात. हमाल, शेतकरी, पोलीस, कामगार

ज्योतिषी किंवा न्हावी, तेली, सोनार इत्यादी पारंपरिक व्यवसायिकविशिष्ट बोली बोलत असतात. त्यांची अवजारे, तसेच विशिष्ट प्रकारच्या क्रिया, त्यांचे वाचक शब्द वेगवेगळे असतात. त्यांचे अर्थ व्यवसायविशिष्ट असतात. त्यातून व्यावसायिक बोलींचा उदय होतो.

**सांकेतिक बोली:**

समाजातील वेगवेगळे गट गुप्तभाषांचा वापर करत असतात. त्यांना सांकेतिक बोली म्हणतात. उदाहरणार्थ व्यापारी क्षेत्रात दलालांची भाषा असते. सैनिकांची भाषा किंवा शाळा महाविद्यालयातील मुलांची त्यांच्या गटापुरती मर्यादित असलेली भाषा या सांकेतिक बोली म्हणता येतील.

**भाषा संपर्क:**

व्यापार आणि राज्यकारभाराच्या निमित्ताने जगाच्या वेगवेगळ्या भागात वसाहती निर्माण झाल्या, तेथे विविध भाषा बोलणारे लोक एकमेकांच्या संपर्कात आले. त्यातून एकमेकांच्या भाषेची देवघेव झाली. तिथे काही नवीन, मिश्रभाषा जन्माला आल्या. अशासंकरित, मिश्रभाषेला पिजीन भाषा असे म्हटले जाते. पिजीन भाषा ही भाषेची प्रारंभिक अवस्था असते. त्यातील एका गटाची भाषाही अधिक प्रबळ आणि दुसऱ्या गटाची भाषाही काहीशी कनिष्ठ मानली जाते. जसे की मजुरांची, कनिष्ठवर्गीयांची भाषा ही कमी महत्त्वाची मानली जाते. मात्र कालांतराने दोघांच्या भाषेतील संकरित रूप संप्रेक्षणासाठी वापरले जाते. पिजन भाषा ही कुणाचीही मातृभाषा नसते. तर ती केवळ व्यापार, व्यवसायासाठी वापरली जाते. काही काळानंतर ती भाषा स्थिर होत राहते. जगात मलेशिया, सिंगापूर, नागालँड, श्रीलंका, मॉरिशस इत्यादी प्रांतात अशा पिजीन भाषा निर्माण झालेल्या दिसतात.

पिजीन भाषा काही काळ वापरली गेली की तिचे क्षेत्र हळूहळू वाढत जाते. ती स्थिर होते. तिची व्याकरणिक संरचना सूक्ष्म होऊ लागते. अशा भाषेला राजप्रतिष्ठा प्राप्त झाली की, तिचे रूपांतर क्रिऑळ भाषेत होते. पुढे त्या भाषेतून ग्रंथव्यवहार, पत्रव्यवहार, ज्ञानव्यवहार सुरू होतात. अशा पिजीन भाषा पासून तयार झालेल्या कितीतरी भाषा क्रिऑळ भाषा म्हणून प्रस्थापित झालेल्या दिसतात. मराठी ही सुद्धा एक मिश्रभाषा आहे. असे काही संशोधकांनी म्हटले आहे. अशाप्रकारे समाजभाषाविज्ञानात अनेक संकल्पना महत्त्वाच्या मानल्या जातात. भाषेचा समाजाशी घनिष्ठ संबंध असतो. त्यामुळे अन्य भाषाविज्ञानाहून समाजभाषाविज्ञानाला सर्वाधिक महत्त्व दिले जाते.

## १.६ समारोप

अशा प्रकारे आपणास भाषा शास्त्राच्या विविध अभ्यास पद्धतीचा सविस्तर अभ्यास करीत असताना भाष्य म्हणजे काय? आणि भाषेची निर्मिती ही मानवी गरजेतून झाली आहे. आणि भाषेला जेव्हा शास्त्राचा दर्जा मिळाला तेव्हा त्या विविध प्रकारानुसार अभ्यास करीत असतांना ऐतिहासिक भाषा विज्ञान आणि वर्णनात्मक भाष्य विज्ञाना या दोन शाखेचा अभ्यास करीत असतांना आपणास भाषेच्या उगमापासून तर त्यांच्या विस्तारापर्यंत आपण या घटकात अभ्यास केला आहे.

भाषा ही मानवाने निर्माण केली आहे परंतु हे मात्र नक्की की, मानव भाषेमुळेच सुसंस्कृत झाला आणि भाषेमुळेच मानवी जीवनाला गती आल्याचे आपणास दिसून येते. प्रमाणभाषा, बोली भाषा, व्यवसायनिहाय बोलली जाणारी भाषा एकूणच वरील विवेचनातून भाषेच्या विविध शाखेचा अभ्यास आपणास करता आला.

## १.७ स्वाध्याय

**खालील प्रश्नाची सविस्तर उत्तरे द्या.**

१. भाषेच्या विविध शाखेचा आढावा घ्या.

२. ऐतिहासिक भाषा विज्ञान म्हणजे काय ? ते सांगून वैशिष्ट्ये सांगा?

३. वर्णनात्मक भाषाविज्ञानाची मूलतत्त्वे कोणती सविस्तर सांगा.

४. समाज भाषा विज्ञानाचे स्वरूप स्पष्ट करा

**टिपा.**

१) वर्णनात्मक भाषा

२) भाषाकृत संकल्पना

३) बोलीभाषा

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) ऐतिहासिक भाषाभ्यासाच्या किती प्रकार आहेत.

२) पश्चातगामी पद्धती म्हणजे काय?

३) लेनर्ड ब्लुमफिल्ड यांनी कोणत्या भाषाभ्यास पद्धतीवर भर दिला.

४) ऐतिहासिक भाषा विज्ञानाचा पाया कोणी घातला.

## १.८ संदर्भ

१. मराठीचा भाषिक अभ्यास, संपा, मु. श्री. कानडे, स्नेहवर्धन पब्लिकेशन, पुणे, १९९४.

२. समाजभाषाविज्ञान, रमेश वरखेडे, शब्दालय प्रकाशन. श्रीरामपूर.

३. मराठी भाषेचा भाषावैज्ञानिक अभ्यास, अलका मटकर, शब्दालय प्रकाशन. श्रीरामपूर, २०१७.

*****

# २

# स्वनिमविन्यास

**घटक रचना**

२.१ उद्देश

२.२ प्रस्तावना

२.३ स्वन संकल्पना

२.४ स्वनांचे गुणधर्म/ लक्षणे

२.५ स्वनिम आणि स्वनांतरे

२.६ स्वनिम आणि स्वनांतरे यांचे लेखनचिन्ह

२.७ स्वनिमाचे प्रकार

२.८ सर्वनाम आणि स्वनांतरे यांचा परस्परसंबंध

२.९ स्वनिम विश्लेषणाची तत्त्वे / तंत्रे

२.१० समारोप

२.११ स्वाध्याय

२.१२ संदर्भग्रंथसूची

## २.१ उद्देश

१) स्वन संकल्पना, स्वनांचे गुणधर्म समजून घेणे.

२) स्वनिम आणि स्वनांतरे या संकल्पना समजून घेणे.

३) स्वनिमाच्या प्रकारांचे विवेचन करणे.

४) स्वनिम आणि स्वनांतरे यांचा परस्परसंबंध अभ्यासणे.

५) स्वनिम विश्लेषणाची तत्त्वे/ तंत्रे स्पष्ट करणे.

## २.२ प्रस्तावना

भाषा ही मौखिक प्रक्रिया असून ती मुखावाटे निर्माण केली जाते. पण भाषेचा मौखिक अभ्यास कमी प्रमाणात होतो व तिच्या लिखित स्वरूपाला अधिक महत्त्व दिले जाते. मुळात भाषा ही ध्वनियुक्त आहे. म्हणून भाषेचा विचार करताना ध्वनिविचार, स्वनिमविचार, पदिमविचार, वाक्यविचार या टप्प्यातून करावा लागतो.

भाषा ही ध्वनींची बनलेली असते. माणूस तोंडावाटे विविध ध्वनी निर्माण करत असतो. उदा. खोकणे, शिंकणे, चुकचुकणे; तसेच बाह्य वातावरणातून पशूपक्ष्यांचा आवाज, वेगवेगळ्या वाहनांचा आवाज इत्यादी ध्वनी निर्माण होत असतात. पण हे ध्वनी म्हणजे भाषा नव्हे. म्हणून भाषावैज्ञानिकांनी साधा ध्वनी आणि भाषेतला ध्वनी यांतील अंतर

मिटविण्यासाठी 'ध्वनी' आणि 'स्वन' या दोन संकल्पना गृहीत धरल्या व त्यानुसार स्वनाची व्याख्या केली. ती पुढीलप्रमाणे –

"मुखावाटे येणारे व भाषेत वापरले जाणारे अर्थयुक्त ध्वनी म्हणजेच स्वन होय."

ना. गो. कालेलकर यांच्या मते, भाषा ही एका विशिष्ट स्वनमालिकेचा उपयोग करून निर्माण केलेल्या संकेतांनी समाजाचे व्यवहार चालवणारी सामाजिक संस्था आहे. ज्या विशिष्ट स्वनिम व्यवस्थेचा उपयोग भाषा करते ती निश्चित स्वनिमांनी बनलेली आणि सुसंवादी असते.

थोडक्यात ध्वनींशिवाय भाषेला अस्तित्त्व नसते. प्रत्येक भाषेत काही ठराविक ध्वनी ठराविक पद्धतीने वापरले जातात यालाच भाषेची स्वनिम व्यवस्था म्हणतात.

## २.३ स्वन संकल्पना

भाषेचे द्रव्य म्हणजे स्वन असे सोस्यूर याने म्हटले. स्वन याचा अर्थ तोंडावाटे निघणारे असंख्य ध्वनी नव्हे तर भाषेत वापरल्या जाणाऱ्या अर्थपूर्ण ध्वनींना स्वन असे म्हणतात. आपण बोलत असतो तेव्हा आपल्या मुखावाटे वेगवेगळे ध्वनी उत्पन्न करीत असतो. आपल्या वागिन्द्रियाद्वारे आपण असंख्य ध्वनी निर्माण करू शकतो. असंख्य ध्वनींची निर्मिती करण्याची आपल्या वागिन्द्रियांची क्षमता अफाट आहे. वागिन्द्रियांद्वारे माणूस जेवढे ध्वनी निर्माण करतो किंवा करू शकतो तेवढे सगळेच ध्वनी भाषेत वापरले जात नाहीत. कोणत्याही भाषेत काही निवडक ध्वनींचाच वापर केलेला असतो. त्यामुळे प्रत्येक भाषेत वापरले जाणारे ध्वनी स्वतंत्र असतात.

भाषेमध्ये उपयुक्त असे कार्य करू शकणारा कोणताही ध्वनी म्हणजे स्वन. ज्या ध्वनीकडे भाषाध्वनी होण्याची क्षमता नसते तो स्वन ठरत नाही. उदा. क, ख, ग, घ, त, थ, प, स इत्यादी काही स्वन आहेत कारण त्यांचा भाषेत वापर होतो. मात्र हसण्याचा हं हं हं... आवाज, रडण्याचा ऊं... ऊं... आवाज, केकाटणे, आरोळी देणे इ. ध्वनी भाषाध्वनीचे काम करत नाहीत म्हणून त्यांना स्वन म्हणता येत नाही.

स्वन जेव्हा सुटेसुटे असतात तेव्हा त्यांना स्वतःचा अर्थ नसतो पण त्यांची रचना झाली की त्यांना स्वतंत्र अर्थ लागतो. भाषेत नेहमी स्वनांच्या रचना वापरल्या जातात. उदा. 'वि', 'का', 'स'

'वि', 'का', 'स' या सुट्ट्या सुट्ट्या स्वनांना अर्थ नाही, पण 'विकास' या एका शब्दाच्या रचनेला अर्थ आहे. त्यामुळे स्वन हे नेहमी रचनेच्या दृष्टीने लक्षात घेतले जातात.

## २.४ स्वनांचे गुणधर्म/ लक्षणे

स्वनांमध्ये पुढील गुणधर्म आवश्यक आहेत:

१) भाषाध्वनी असण्याची क्षमता

२) व्यक्तिविशिष्टता

३) विभेदकता

४) लवचिकता

**१) भाषाध्वनी असण्याची क्षमता:**

भाषाध्वनी असण्याची क्षमता हे स्वनांचे पहिले आणि प्रधान लक्षण होय. वागेंद्रियांद्वारे असंख्य ध्वनी निर्माण केले जातात परंतु सर्वच ध्वनींना स्वन म्हणता येत नाही. ज्या ध्वनींचा भाषेत वापर केला जातो त्यांनाच स्वन म्हणतात. म्हणून ध्वनीच्या अंगी भाषाध्वनी असण्याची क्षमता असणे गरजेचे आहे.

**२) व्यक्तिविशिष्टता:**

भाषा ही एकेका व्यक्तीकडून बोलली जाते त्यामुळे स्वनांचे उच्चारण व्यक्तिविशिष्ट असते. उच्चारणावरून बोलणाऱ्याचे लिंग, वय, त्याची मनस्थितीसुद्धा लक्षात येते. नुसते बोलणे ऐकून बोलणारा कोण आहे याचा अंदाज आपल्याला व्यक्तिविशिष्टता यामुळेच लागू शकतो.

**३) विभेदकता:**

विभेदकता हे स्वनाचे महत्वाचे लक्षण आहे. एक स्वन हा आपल्या वैशिष्ट्यपूर्ण उच्चारामुळे दुसऱ्या स्वनापासून वेगळा ठरतो त्यामुळे शब्दांचे वेगळेपण लक्षात येते.

उदा. 'काटा' आणि 'फाटा' या दोन शब्दांचा स्वनिक परिसर जरी सारखा असला तरी 'क' आणि 'फ' या वेगवेगळ्या उच्चारणांमुळे ते वेगळेवेगळे झालेले आहेत.

**४) लवचिकता:**

भाषेत स्वन एकापाठोपाठ एक याप्रमाणे जलद गतीने उच्चारले जातात तरीही आपल्याला एक शब्द कोठे संपला, वाक्य कोठे संपले, वाक्यात कोणत्या शब्दावर जोर आहे हे कळते. म्हणजेच स्वनाचे उच्चारण लवचिक असते.

## २.५ स्वनिम आणि स्वनांतरे

स्वनिम हा भाषाविज्ञानातील अत्यंत महत्त्वाचा असा स्वनांचा संबोध आहे. स्वनांचा संच म्हणजे स्वनिम. आंशिक उच्चारसाम्य असलेल्या स्वनांचा एक गट केला जातो; हा गट सोयीसाठी केलेला असतो, या गटाला स्वनिम म्हटले जाते.

स्वनिम हा भाषेतला लघुतम व अंतिम घटक असल्यामुळे त्याचे विभाजन करता येत नाही.

उदा. चर = च + अ + र

कर = क + अ + र

याचे विभाजन आणखी होऊ शकत नाही म्हणून त्यांना ‘निरवयव' असे म्हणतात.

भाषेतील ध्वनींमध्ये अर्थनिर्णायक क्षमता असते. दोन शब्दातील अर्थभेद दाखवण्याचे कार्य ध्वनी करत असतात. त्यामुळे दोन शब्द वेगळे ठेवता येणे शक्य होते. भाषेतील अशा स्वन लक्षणांना स्वनिम म्हणतात.

स्वनिम भाषाविज्ञानामध्ये उच्चाराशी संबंधित आहे. त्याचा लिखित भाषेशी काही संबंध नसतो.

उदा. इंग्रजी भाषेतील Catch, Match या शब्दांमधे अनुक्रमे ५ लेखिम आहेत, तर २ स्वनिम आहेत. 'Catch' या शब्दात 'कॅ' आणि 'च' हे दोन स्वनिम आहेत. 'Match' या शब्दात 'मॅ' आणि 'च' हे दोन स्वनिम आहेत.

स्वनिम हे सुटेसुटे असल्यामुळे ते स्वतंत्र स्वरूपात अस्तित्वात असतात. उदा. फार, कार, मार, गार या शब्दांमध्ये यातील आद्याक्षर हे स्वतंत्र स्वनिम आहेत, उरलेले सगळे स्वन आहेत.

उदा. फार = फ + आ + र

मार = म + आ + र

गार = ग + आ + र

ज्या शब्दांमध्ये स्वनिक साम्य आहे, ज्यांच्यातील आजूबाजूच्या परिस्थितीमुळे होणारा फरक, होणारे परिवर्तन अंदाजक्षम आहे अशा ध्वनींच्या समूहास 'स्वनिम' म्हणतात आणि या समूहात समाविष्ट असणाऱ्या ध्वनींना 'स्वनांतरे' म्हणतात.

कोणताही स्वनिम हा स्वनांतराच्या रुपाने मूर्त होतो, म्हणजेच स्वनांतराच्या रूपाने उच्चारला जातो. भाषेत स्वनिम नसतो तर स्वनांतरे असतात. स्वनिमाच्या गटात समाविष्ट केलेल्या प्रत्येक ध्वनीला त्या स्वनिमाची स्वनांतरे म्हणतात. कोणतीही स्वनांतरे स्वनिमसापेक्ष असतात.

स्वनिम ही एक अमूर्त कल्पना आहे. स्वनिम काल्पनिक असतो आणि स्वनांतरे ही स्वनिम कल्पनेची प्रात्यक्षिके असतात. भाषेत स्वनिम वापरला जात नाही तर स्वनांतरे वापरली जातात. भाषेमध्ये स्वनिम हे साधारणपणे केवळ चाळीस- पन्नास इतके अल्प प्रमाणात असतात. पण ते स्वनिम एकत्र येऊन हजारो रुपिमे तयार होतात. स्वनिम हा भाषेमध्ये नेहमी अमूर्त स्वरुपात असतो, तो स्वनांतराच्या रूपाने भाषेत प्रकट होतो. तो फक्त कानांना ऐकू येतो.

एखादा स्वन हा उच्चार आणि त्यातील अंतरामुळे वेगवेगळ्या पद्धतीने ऐकू येतो. उदा. 'ग' हा स्वन.

* 'ग'चे विविधतापूर्ण उच्चार आढळतात.

(बाग, जागी, गुलाम, नागपूर, गती)

१) बाग - 'बाग' शब्दात 'ग' चा उच्चार स्फोटहीन आहे.

२) जागी - 'जागी' शब्द उच्चारताना 'ग' चा उच्चार थोडा पुढील बाजूस होतो.

३) गुलाम - येथे 'ग' चा उच्चार तोंडात थोडा मागील बाजूस होतो.

४) नागपुर - येथे 'ग' चा उच्चार स्फोटहीन नसून 'क' कडे झुकणारे आहे.

५) गती - गती शब्द उच्चारताना 'ग' चा उच्चार सरळ, साधा आहे.

अशाप्रकारे 'ग' या स्वनाचे 'ग'१, 'ग'२, 'ग'३, 'ग'४, 'ग'५ असे उच्चार आढळतात.

## २.६ स्वनिम आणि स्वनांतरे यांचे लेखनचिन्ह

स्वनिम आणि स्वनांतरे यांचे लेखन करण्याची एक विशिष्ट पद्धत आहे. स्वनिम हा नेहमी तिरप्या रेषेत लिहिला जातो, तर त्याची स्वनांतरे चौकटी कंसात लिहिली जातात.

उदा.


/ / स्वनिम

[ ] स्वनांतरे

/ग/ = [ग१], [ग२], [ग३], [ग४], [ग५]

/ड/ = [ड१], [ड२], [ड३], [ड४]

* स्वन आणि स्वनांतरे दाखवताना पुढील आकृतीतून दाखवतात




## २.७ स्वनिमाचे प्रकार

स्वनिमाचे दोन भाग पडतात.

१) खंडित स्वनिम

२) खंडाधिष्ठित स्वनिम

**१) खंडित स्वनिम :**

"ज्यांचा उच्चार वेगळेपणाने करता येतो त्याला खंडित स्वनिम म्हणतात."

खंडित स्वनिम अर्थ प्रगटीकरण करण्याचे काम करतात. खंडित स्वनिमाच्या आधाराशिवाय कोणताही भाषाव्यवहार पूर्ण करता येत नाही. या स्वनिमाला साधारणतः लिपीमध्ये चिन्ह असते. हे स्वनिम सुटेसुटे असतात. ते भाषेत मुबलक प्रमाणात असतात. त्यांचा उच्चार आपण वेगळेपणाने करतो.

उदा. क, ख, ग, घ, प, फ, ब, भ, म

खंडित स्वनिम एकदम उच्चारता येत नाहीत. ते परस्परानुसारी असतात. म्हणजे ते एकामागोमाग एक असे उच्चारले जातात.

उदा. 'क' आणि 'ख' हे दोन खंडित स्वनिम आहेत. ते एकदम उच्चारता येत नाहीत.

**२) खंडाधिष्ठित स्वनिम:**

“जे स्वनिम स्वतंत्रपणे उच्चारता येत नाहीत, ज्यांचा उच्चार खंडित स्वनिमांबरोबर करावा लागतो त्यांना खंडाधिष्ठित स्वनिम असे म्हणतात.”

बोलणाऱ्या व्यक्तीने स्वनावर दिलेला आघात, स्वनातील आरोह- अवरोह, नाकावाटे बाहेर येणारा श्वास, त्याच्या गतीवर आधारलेले स्वन व त्यांचे उच्चारण यामुळे भाषेत अर्थ व्यक्त होतो. अर्थ व्यक्त करणाऱ्या या उच्चारणाला खंडाधिष्ठित स्वनिम म्हणतात. बोलताना माणूस एखाद्या लयीत बोलतो, कधी स्वनांवर जोर देतो, कधी स्वनांचा अस्पष्ट उच्चार करतो. म्हणजेच उच्चारणामध्ये चढ-उतार असतात, सुरांच्या लयीमध्ये आघात असतो; माणूस बोलता बोलता मध्येच थांबतो आणि हे सगळे प्रकट करण्यासाठी भाषेत कोणतेही लेखन चिन्ह नसते यालाच खंडाधिष्ठित स्वनिम म्हटले जाते.

खंडाधिष्ठित स्वनिमाच्या उच्चारणाच्या वेळी बोलणारा माणूस हा भाषेमध्ये कोठे थांबतो त्यानुसार अर्थ बदलत जातो.

उदा. ‘ती फार हुशार आहे'

या वाक्यात एकत्रितपणे स्वनांचा उच्चार केल्यास त्यातून अर्थबोध होणार नाही. तर खंडाधिष्ठित स्वनिमाचे सहाय्य घेतले तर 'ती फार हुशार आहे' हा अर्थ स्पष्ट होतो. म्हणून ध्वनी, शब्द, पद आणि संपूर्ण वाक्यबंध लक्षात घ्यावा लागतो. ध्वनिप्रवाह कमी जास्त आघातानुसार वापरावा लागतो.

*** खंडाधिष्ठित स्वनिमाचे प्रकार:**

१) अवधी

२) बलाघात

३) सुरांचा चढउतार

४) सीमासंधी

५) नासिक्यरंजन

**१) अवधी:**

एखाद्या ध्वनीचे उच्चारण कमीत कमी वेळात किंवा वेळ लावून करता येत असेल तर अशा रीतीने लागणाऱ्या वेळाला अवधी म्हणतात. ध्वनीच्या उपयोजनामध्ये वेळ म्हणजे अवधी याला महत्त्व दिले जाते. स्वरांचा उच्चार किंचित काळ लांबवून त्यांना दीर्घत्व हा गुणधर्म देता येतो.

उदा. विणा – विणकाम करा.

वीणा – एक वाद्य

**२) बलाघात:**

बोलत असताना आपण शब्दांवर विशिष्ट पद्धतीने आघात देतो त्याला 'बलाघात' असे म्हणतात. एखाद्या शब्दावरील किंवा अक्षरावरील आघातामुळे अर्थभेद घडून येतो. हा आघात दोन प्रकारे असतो.

i) शब्दातील अक्षरावर दिलेला आघात

ii) वाक्यातील शब्दांवर दिलेला आघात

**i) शब्दातील अक्षरावर दिलेला आघात:**

जेव्हा विशिष्ट शब्दातील अक्षरावर आघात दिला जातो तेव्हा त्या आघातानुसार त्याचा अर्थ स्पष्ट होतो.

उदा. विद्या, कन्या, भिन्न

याठिकाणी आद्याक्षरावर आघात दिल्यामुळे अर्थ स्पष्ट होतो. 'विद्या' या शब्दात ‘वि' वर आघात द्यावा लागतो, 'कन्या' शब्दात ‘क' वर आघात द्यावा लागतो, तर ‘भिन्न’ उच्चारताना ‘भि’वर आघात दिला जातो.

**ii) वाक्यातील शब्दावर असलेला आघात:**

वाक्यातील विशिष्ट शब्दावर दिलेल्या आघातानुसार अर्थभेद घडून येतो.

उदा. आज पाऊस पडणार आहे.

आज पाऊस पडणार आहे.

येथे पहिल्या वाक्यात 'आज’ आणि दुसऱ्या वाक्यातील 'आहे' या शब्दांवर आघात दिल्याने अर्थ बदल झाला आहे. म्हणजेच विशिष्ट शब्दावर दिलेल्या आघातामुळे दोन्ही वाक्यांचा अर्थ बदललेला आहे.

### ३) सुरावली (सुराचा चढउतार):

माणसाच्या बोलण्यातील स्वराच्या चढउतारामुळे अर्थभेद घडून येतो. सुरावली म्हणजेच सुराचा चढउतार होय. याला अनुतान असेही म्हटले जाते. प्रत्येक व्यक्तीच्या बोलण्यात सुरांचा चढउतार होतच असतो. लेखनामध्ये विधानार्थी वाक्याचे प्रश्नार्थक किंवा उद्गारवाचक वाक्य करायचे असेल तर ते ते चिन्ह देऊन केले जाते. तर बोलताना सुरावलीचा चढउतार करून विधानार्थी वाक्याचे प्रश्नार्थक किंवा उद्गारवाचक वाक्य केले जाते.

उदा.

तो क्रिकेट खेळतो. (विधानार्थी वाक्य)

तो क्रिकेट खेळतो. (प्रश्नार्थक वाक्य)

तो क्रिकेट खेळतो. (उद्गारचक वाक्य)

तो काम करतो. (विधानार्थी वाक्य)

तो काम करतो. (प्रश्नार्थक वाक्य)

तो काम करतो. (उद्गारचक वाक्य)

### ४) सीमासंधी:

सीमासंधी म्हणजे वाक्यामध्ये दिलेला खंड किंवा विराम. वाक्यातील विराम बदलल्यावर अर्थबोध होतो.

उदा.

तू गावाला जाऊ नये.

तू गावाला जाऊन ये.

किती सामान आहे

कितीसा मान आहे

मद्यपान करू नये

मद्यपान करून ये.

### ५) नासिक्यरंजन:

नासिक्यरंजन यामुळे अर्थभेद संभवतो. कोणत्याही ध्वनीचा उच्चार नासिक्यसहित व नासिक्यरहित असू शकतो. काही स्वनिमांच्या संदर्भात नासिक्यसहित उच्चाराने अर्थभेद होतो.

उदा. रांग, ऐंशी, कंप, आंबा

अशाप्रकारे भाषेमध्ये खंडित स्वनिम व खंडाधिष्ठित स्वनिमामुळे भाषेचे सौंदर्य वाढते. स्वनिम व खंडाधिष्ठित हे दोन्ही स्वनिम उच्चारणाशी संबंधित आहेत. लिखित भाषेशी त्याचा संबंध फार थोडा आहे. कधीकधी भाषेतील स्वर व व्यंजने एकत्र येऊन जो अर्थ प्रकट होत नाही तोच उच्चारणाच्या प्रकटीकरणामुळे, बलाघातामुळे, सुरावलीमुळे विविध पद्धतीने ऐकू येतो. त्यामुळे खंडित स्वनिम व खंडाधिष्ठित स्वनिमामुळे भाषेला एक प्रकारचे चैतन्य अधिक प्रभावीपणे प्राप्त होते.

## २.८ स्वनिम आणि स्वनांतरे यांचा परस्पसंबंध

- स्वनिम काल्पनिक संबोध आहे, तर स्वनांतरे ही स्वनिम कल्पनेची प्रात्यक्षिके असतात. म्हणजेच स्वनिमाला भाषेत अस्तित्त्व नसते. भाषेत अस्तित्वात असतात ती स्वनांतरे.
- स्वनिमाच्या गटात समाविष्ट केलेल्या प्रत्येक ध्वनीला त्या स्वनिमाची स्वनांतरे म्हणतात.
- भाषेत वापरल्या जाणाऱ्या, एकमेकांशी स्वनिकदृष्ट्या साम्य असणाऱ्या स्वनांतरांना एकत्र घेऊन त्यांचा गट बनविला जातो. या गटाला स्वनिम नावाने ओळखले जाते. भाषेत असे अनेक गट असतात.
- स्वनांचा संच म्हणजे स्वनिम तर स्वनांतरे एका कुटुंबासारखे असतात.
- दोन शब्द अर्थदृष्ट्या वेगळे राखणे हे स्वनिमाचे कार्य असते. म्हणजे स्वनिम अर्थविभेदक असतो. स्वनांतराचा विचार स्वनिमसापेक्ष करावा लागतो.
- स्वनिमामध्ये वैधर्म्ययुक्त विनियोग असतो. तसेच स्वनिम हा संकल्पनात्मक गट असतो, तर स्वनांतरे त्या गटाचे प्रत्यक्ष उच्चारले जाणारे सभासद असतात.

## २.९ स्वनिम विश्लेषणाची तत्त्वे / तंत्रे

भाषावैज्ञानिक भाषेतील अनेक उच्चार गोळा करतात आणि मग त्याचे विश्लेषण करून स्वनिम, पदिम निश्चित करतात. भाषेमध्ये स्वनिम कोणते व किती हे ओळखण्याचे तत्त्व / तंत्र भाषाविज्ञानात निश्चित करण्यात आले आहे. कोणत्याही भाषेतील स्वनिम निश्चित करण्यासाठी या तत्त्वाचा विचार केला जातो. स्वनिम विश्लेषणाची ही तत्त्वे वा तंत्रे पुढीलप्रमाणे-

१) पूरक विनियोग

२) वैकल्पिक/ मुक्त विनियोग

३) वैधर्म्ययुक्त विनियोग/ व्यवच्छेदक विनियोग

४) काटकसरीचे तत्त्व

**१) पूरक विनियोग:**

एका स्वनिमाची भिन्न भिन्न स्वनांतरे स्पष्ट करण्यासाठी पूरक विनियोग हे तत्त्व वापरले जाते. स्थानपरत्वे भिन्न पण अर्थनिर्णायक नसलेले स्वन पूरक विनियोगाने दाखवले जातात.

उदा.

काट - कॉट

कट - कप

**२) वैकल्पिक/ मुक्त विनियोग:**

वैकल्पिक किंवा मुक्त विनियोग हे दोन भिन्न स्वनिमांमध्येही असू शकते किंवा स्वनिमाचे ते वैकल्पिक रूपही असू शकते. काही स्वन दोन प्रकारे उच्चारले जातात. तर काही व्यक्तिपरत्वे भिन्न भिन्न उच्चारले जातात.

उदा.

जपान, जहाज

'जहाज'मधील 'ज' आणि 'जपान'मधील 'ज' वेगवेगळ्या पद्धतीने उच्चारले जातात.

किंवा

मी काम करेन/ करीन.

मी दार उघडेन/ उघडीन.

पहिल्या वाक्यात करेन/ करीन यामधील 'रे', 'री' हे स्वन मुक्त विनियोग आहेत. तर दुसऱ्या वाक्यात उघडेन/ उघडीन यामधील 'डे', 'डी' हे स्वन मुक्त विनियोग आहेत. ते व्यक्तिपरत्वे भिन्न भिन्न उच्चारले जातात.

**३) वैधर्म्ययुक्त विनियोग/ व्यवच्छेदक विनियोग:**

एका स्वनाच्या जागी त्याच स्वनिक परिसरात दुसरा स्वन येतो व तो विभेदक असतो, म्हणूनच त्याला स्वनिम असे म्हटले जाते. व्यवच्छेदक विनियोगाच्या पद्धतीने त्या विशिष्ट भाषेतील स्वनिम संख्या निश्चित करता येते.

कोणतेही दोन स्वनिम परस्परांपासून वेगळे आहेत हे वैधर्म्ययुक्त विनियोग तत्वाने सांगता येते.

उदा.

काट - खाट

काय – गाय

**४) काटकसरीचे तत्त्व:**

काटकसर या तत्वात भाषेतील अनावश्यक स्वन टाळले जाते. आपल्या वागिन्द्रियाजवळ असंख्य ध्वनी निर्माण करण्याची क्षमता असते. तरीही कोणत्याही भाषेत ३० ते ४० पेक्षा अधिक स्वनिम आढळत नाहीत. कमीत कमी ध्वनींच्या सहाय्याने भाषा आपले भाषिक व्यवहार साधत असते. काटकसरीच्या तत्त्वामुळेच भाषेतील आवश्यक नसलेले स्वन टाळले जातात.

उदा. संस्कृत वर्णमालेतील सर्वच स्वन मराठी वर्णमालेत स्वीकारले गेले नाहीत. 'ऋ' हा संस्कृत स्वन मराठीत फारसा वापरला जात नाही म्हणून तो मराठी वर्णमालेतून काढण्यात आला.

अनावश्यक ते गाळून टाकणे म्हणजे काटकसरीचे तत्त्व असे वर्णनात्मक भाषावैज्ञानिकांचे मत आहे. काटकसरीचे तत्त्व वापरून ज्या गोष्टी सामान्य आहेत त्यांची काटकसर केली जाते आणि ज्या असामान्य आहेत त्याच फक्त नोंदवल्या जातात.

## २.१० समारोप

अशाप्रकारे ध्वनींशिवाय भाषेला अस्तित्त्व नसते. प्रत्येक भाषेत काही ठराविक ध्वनी ठराविक पद्धतीने वापरले जातात यालाच भाषेची स्वनिम व्यवस्था म्हणतात. स्वनिम ही एक अमूर्त कल्पना असून तो काल्पनिक असतो आणि स्वनांतरे ही स्वनिम कल्पनेची प्रात्यक्षिके असतात. भाषेत स्वनिम वापरला जात नाही तर स्वनांतरे वापरली जातात.

**आपली प्रगती तपासा:**

१) स्वन - स्वनिम - स्वनांतरे

## २.११ स्वाध्याय

**दीर्घोत्तरी:**

१) स्वन म्हणजे काय ते सांगून स्वनिम आणि स्वनांतरे या संकल्पना सोदाहरण स्पष्ट करा.

२) स्वनांची लक्षणे अथवा गुणधर्म कोणते ते सांगून स्वनिमविन्यास या संकल्पनेचा सविस्तर परामर्श घ्या.

३) स्वन स्वनिम आणि स्वनांतरे या संकल्पना मांडून मराठी भाषेतील स्वनिम निश्चित करण्याची तत्त्वे स्पष्ट करा.

**टीपा :**

१) स्वन संकल्पना

२) स्वनिम आणि स्वनांतरे

३) स्वनिमाचे प्रकार

४) स्वनिम विश्लेषणाची तत्त्वे / तंत्रे

५) स्वनिम आणि स्वनांतरे यांचा परस्पसंबंध

**एका वाक्यात उत्तरे लिहा:**

१) भाषेचे द्रव्य म्हणजे स्वन असे कोणी म्हटले?

२) खंडित स्वनिम म्हणजे काय?

३) खंडाधिष्ठित स्वानिम म्हणजे काय?

४) स्वनिम म्हणजे काय?

५) स्वनांतराचे लेखन कशा पद्धतीने केले जाते?

## २.१२ संदर्भग्रंथसूची


- कालेलकर ना. गो., ध्वनिविचार, (दु.आ.), मौज प्रकाशन, मुंबई, १९९०
- काळे कल्याण व इतर (संपा), वर्णनात्मक भाषाविज्ञान स्वरूप आणि पद्धती, गोखले एज्युकेशन सोसायटी, नाशिक
- काळे कल्याण व इतर (संपा), आधुनिक भाषाविज्ञान, प्रतिमा प्रकाशन, पुणे, (दु.आ.) २००३
- गजेंद्रगडकर श्री. न., भाषा आणि भाषाशास्त्र, व्हिनस प्रकाशन, पुणे, दु. आ.
- गोविलकर लीला, वर्णनात्मक भाषाविज्ञान, आरती प्रकाशन, डोंबिवली, १९९२
- मालशे स. गं. व इतर (संपा), भाषाविज्ञान ऐतिहासिक व वर्णनात्मक, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, (ति. आ.), २००५
- मटकर अलका, मराठी भाषेचा भाषावैज्ञानिक अभ्यास, शब्दालय प्रकाशन, २०१५.


*****

# ३

# रुपिमविन्यास

प्रिय विद्यार्थ्यांनो.

रुपिमविन्यास या तिसऱ्या घटकात रूपिका,रूपिम आणि रूपिकांतर या संकल्पनेचा अभ्यास करावयाचा आहे.

**घटक रचना**

३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ समारोप

३.३ सरावासाठी काही प्रश्न

## ३.० उद्दिष्टे

१) विद्यार्थ्यांना रूपिम विचाराची माहिती देणे.

२) विद्यार्थ्यांना रुप,रुपिम रूपिकांतर या संकल्पना समजून देणे

३) रूप आणि रुपिका या समजून देणे

४) रूपिका आणि शब्द यांचे परस्परसंबंध स्पष्ट करणे.

५) रूपिका आणि रूपिम यातील वेगळेपण स्पष्ट करणे.

६) विद्यार्थ्यांना रूपिमांच्या प्रकाराची माहिती करून देणे

७) रूपिकांतर ही संकल्पना समजून देऊन प्रकाराची माहिती देणे.

## ३.१ प्रस्तावना

भाषाविज्ञानात रुपिम विचाराला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. भाषाविज्ञानात स्वन, स्वनिम, स्वनांतर ही जशी साखळी आहे तशीच रुपिका, रुपिम आणि रुपिकांतर ही साखळी आहे. स्वनिम विचार आणि रूपिमविचार एकमेकांवर अवलंबून आहेत. शब्द या संज्ञेत निर्माण झालेली संदिग्धता टाळण्यासाठी आणि भाषेच्या अभ्यासाला अधिक काटेकोरपणा येण्यासाठी भाषाविज्ञाना रुप/ रूपिका ही संज्ञा वापरली आहे. स्वनिमानंतर भाषेत वापरला जाणारा अर्थपूर्ण घटक म्हणजे रूपिम असतो. शब्दांतील आणि वाक्यातील अर्थपूर्ण घटक म्हणून च रूपिमाकडे पाहिले जाते. रूपिम हा भाषेतील लघुत्तम अर्थपूर्ण घटक असतो.रुपिमांच्या अभ्यासालाच रुपिमविचार असे म्हणतात. रूपिम विचारातील रूपिका, रूपिम, रूपिकांतर या संज्ञेला पद, पदीम, पदांत्तर असे ही म्हटले जाते. या संकल्पना आणि त्यांचे स्वरुप खालीलप्रमाणे समजून घेता येईल.

**१) रुपिका म्हणजे काय?:**

शब्द ही संज्ञा अतिशय ढोबळ आहे. जुन्या पारंपरिक व्याकरणामध्ये 'शब्द' ही पारिभाषिक संज्ञा केवळ कोशातील अर्थ या अर्थानी वापरली आहे. त्या अर्थाशी भाषा विज्ञानातील या शब्द कल्पनेचा गोंधळ होऊ नये म्हणून भाषा विज्ञानाने रुपिम किंवा पदिम या स्वतंत्र संज्ञा निवडल्या आहेत. रुपिका, रुपिम, रूपिकांतर या तीन कल्पना स्वन, स्वनांतर व स्वनिम या कल्पनांनी समांतर आहेत. रूपिका म्हणजे भाषेतील अर्थपूर्ण असा छोटा घटक होय. अर्थदृष्टया रूपिकांचे विभाजन होत नाही. रूपिकांना व्याकरणिक अर्थ असतो. ज्याप्रमाणे स्वन हे भाषा निरपेक्ष असतात तसेच रूपिका ही भाषा निरपेक्ष असते. रूपविचार कोशगत अर्थाशी संबंधित असतो. प्रत्येक रूपिका अर्थनिर्णायक असते. एखादी रूपिका ही रूपिकांतर असलेच असे नाही. रुपिका म्हणजे भाषेतील लघुत्तम सार्थ घटक होय.

उदाहरणार्थ आकाश, गंगा, सूर्य, आत, मी, जमीन, दुकान, कागद, पेन, झाड, दगड वही स्वर्ग नरक, तो इत्यादी या रूपिका आहेत.या रुपिकेचे विभाजन होत नाही केल्यास त्यास अर्थ प्राप्त होत नाही. म्हणून रुपिका म्हणजे लहानात लहान अर्थपूर्ण घटक म्हणजे रूपिका असे म्हटले जाते.

**रुपिका व शब्द तुलना:**

शब्द संज्ञा आपणास परिचयाची आहे. रूपिका व शब्द यांच्यात नेमका कोणता फरक आहे. हे जाणून घेण्यासाठी रूपिकेची कल्पना स्पष्ट होईल. शब्द हा रुपिकेपेक्षा मोठा घटक आहे. एखाद्या शब्दात अनेक रूपिका असू शकतात जसे की उदाहरणार्थ सूर्यप्रकाश, मानसशास्त्र, सुधारकेंद्र, पाठशाळा, मीठभाकर, साखरभात अशी सामासिक शब्दात दोन रूपिका असतात जसे

१) सूर्य + प्रकाश

२) मानस + शास्त्र

३) सुधार + केंद्र

४) पाठ + शाळा

५) मीठ + भाकर

६) साखर + भात

वरील उदाहरणावरून हे लक्षात येते की, रूपिका ही शब्दापेक्षा लहान आहे. ती लहान असली तरी तु अर्थपूर्ण असते. शब्द आणि रूपिका यातील भेद स्पष्ट कळण्यासाठी पुढील उदाहरण पाहाता येईल.

**१)' गुरूजीने वर्गात प्रवेश केला':**

या वाक्यात गुरूजी,वर्गात,प्रवेश,कर हे शब्द आहेत. अर्थातच त्या रुपिका ही आहेत. त्यांना अर्थ आहे. हा त्यांचा अर्थ त्यांना रुढीने दिलेला आहे. त्यांचा अर्थ आपणाला कोशामध्ये

मिळू शकतो. परंतु *'ने' 'त' ' ला'* यांना कोणताच अर्थ नाही म्हणून हे शब्द नाहीत, तर केवळ प्रत्यय आहेत पण ते शब्द नसले तरी रूपिका आहेत. त्यांना व्याकरणिक अर्थ असतो. 'ने' ही रुपिका 'गुरूजी' या रुपिकेला जोडल्याने 'त' ही रूपिका 'वर्गा' या रूपिकेला जोडल्याने आणि 'ला' ही रूपिका 'के' (कर) या रूपिकेला जोडल्याने वाचकाला अर्थबोध होऊ शकतो. त्यांच्या सहकार्याशिवाय भाषिक व्यवहार पुर्ण होऊ शकत नाही. रूपिकेच्या संदर्भात हे लक्षात घेतल्यास शब्द व रूपिका यांच्यातील वेगळेपणा दिसून येतो.

उदाहरणार्थ खेळाडूनी उत्साहाने सामना जिंकला.

उपरोक्त वाक्यात नी, ने, ला, या रूपिका आहेत यांना कोशागत कुठलाच अर्थ नाही परंतु व्याकरणिक अर्थ वाक्याला अर्थप्राप्त होण्यासाठी या रूपिका महत्वाच्या आहेत. खेळाडू +नी (वचनप्रत्यय) जिंक +ला (विभक्ती प्रत्यय तसेच काळदर्शक ही प्रत्यय ) या वाक्यात नी,ला,या रूपिका आहेत कारण त्यांना व्याकरणिक अर्थ आहे. या रुपिकामुळे वाक्याला अर्थप्राप्त होत असतो. शब्द ही संकल्पना अनेक ठिकाणी अनेक अर्थाने वापरली जाते. शब्दकोशातील शब्द, वाक्यातील शब्द, समासातील शब्द, साधित शब्द इत्यादी. वाक्यात येणारा शब्द आणि त्याचे शब्दरूप विशिष्ट पध्दतीने येते. म्हणून रूपिमविचारात 'रूपिका' या घटकाला विशेष महत्त्व आहे.

**रूपिम म्हणजे काय?:**

भाषा निरपेक्ष रूपिका जेव्हा भाषासापेक्ष होतात त्यांना रूपिम असे म्हटले जाते.

उदाहरणार्थ :- वैशाली सुंदर नृत्य करते.

वरील वाक्यात वैशाली, सुंदर, नृत्य, करते या एकुण चार रूपिका आहेत.या रूपिकांचे वाक्यात प्रत्यक्ष वापर केल्यामुळे त्या रूपिम ठरतात. विशिष्ट भाषेतील लघुत्तम सार्थ रूप म्हणजे रूपिम होय. रुपिम हे काल्पनिक असतात. रुपिम अर्थनिर्णायक असते. रूपिमाचे ही विभाजन करता येत नाही. रूपिकांतराच्या सादृश्य गटाला रूपिम म्हणतात. उदाहरणार्थ {घर } या रूपिमेत पुढील रूपिकांतरे सामावलेली आहेत. घरा/ घराने/ घरानं/ घरानी /घरपण रूपिकांतरे इत्यादी 'घर' रुपिमेचे रूपिकांतरे आहेत. रुपिमही अर्थनिर्णायक असते.

ज्याप्रमाणे भाषेत स्वनिम योजलेले नसतात तर भाषेत स्वनांतरे असतात. त्याचप्रमाणे वाक्यात रूपिमे नसतात तर रूपिकांतरे असतात. रुपिम ही अमूर्त कल्पना आहे. प्रत्यक्ष मुर्त रुपिकांतरे असतात. रूपिमांची कल्पना मुळातच अर्थाशी संबंधित आहे. ज्यांना व्यवहारी जगात अर्थ आहे किंवा शब्दकोशात ज्यांना अर्थ आहे. अशा रुपिमांचा समावेश आशयबोधक रूपिम होतो. यांचा वापर भाषेत स्वतंत्रपणे होतो. मुक्त रूपिमांचा अंतर्भाव आशयबोधक रूपिमामध्ये होतो. कार्यकार रूपिमे ही सतत आशयबोधक रूपिमाला जोडून येतात त्यांना बध्द रुपिमे असे ही म्हटले जाते.

**रुपिम विनियोग:**

विनियोग म्हणजे उपयोग किंवा वापर होय. भाषेत रुपिमाचा वापर अशा पद्धतीने होतो. याचा विचार विनियोगात केला जातो. रुपिमाचा विनियोग तीन प्रकारे केला जातो.

१) वैधर्म्ययुक्त किंवा व्यवच्छेदक विनियोग.

२) पूरक विनियोग

३) वैकल्पिक

**विनियोग:**

**१) व्यवच्छेदक विनियोग :**

*एकच रुप, एकच अर्थ*

रूपिमांचे भाषेत उपयोजन होताना जेव्हा एकच अर्थ व एकच रूप आणि एकच विनियोग होतो तेव्हा व्यवच्छेदक विनियोग होतो. उदाहरणार्थ नदी, नदीने, नदीकाठाने, नदीमुळे, नदीपर्यंत इत्यादी शब्दांमध्ये नदी हेच रूप त्याच अर्थाने उपयोगात आलेले आहे त्यामुळे ते एकच मानने योग्य आहे.

**२) रुप भिन्न व अर्थ भिन्न :**

रूपिमांचे रुप भिन्न असते व त्याचा अर्थ सर्वस्वी भिन्न असतो अशा रूपिमाच्या संदर्भात व्यवच्छेदक विनियोग असतो.

**पूरक विनियोग:**

पूरक विनियोगात अल्परूप भिन्नता असली तरी अर्थात समानता असते. अशा रुपिमांचा समावेश यात होतो. ही वेगवेगळी रूपे एकमेकांच्या जागी कधीही येत नाहीत.

| | | | |
|---|---|---|---|
| उदाहरणार्थ | करणे | --- | करतो |
| | होणे | -- | झाले |
| | जाणे | - | जातो |
| | असणे | - | असतो |

वरील उदाहरणात रूपिम रूप दृष्टीने भिन्न आहेत परंतु भाषेत त्यांचा उपयोग एकाच अर्थाने होतो. शिवाय ते एकमेकांच्या जागी कधीच येत नाहीत म्हणून त्यांचा विनियोग पूरक ठरतो.

**३) वैकल्पिक विनियोग:**

ज्या रूपिमांचे रुप वेगळे असते परंतु अर्थदृष्टीने रुपिम एकच असतात, अशा रूपिमांच्या विनियोगाला वैकल्पिक विनियोग म्हणतात.

उदाहरणार्थ :- त्याने, त्यांनी,त्यानं.

मराठीत काही शब्दांच्या बाबतीत एक रुप असते परंतु त्याचा अर्थ भिन्न असतो अशी उदाहरणे व्यवच्छेदक विनियोगाची होत.

| | | | |
|---|---|---|---|
| उदाहरणार्थ | कर | - | हात |
| | कर | - | करणे |
| | कर | - | होळी सणाचा दुसरा दिवस |
| | कर | - | टॅक्स |

रुप एकच आहे परंतु अर्थ भिन्न भिन्न आहेत.

**रुपिमांचे प्रकार:**

**१) अनन्यसाधारण रुपिम:**

रूपिम निश्चित करताना त्यांच्या विभाजनाचा भाग हा सार्थ असणे आवश्यक आहे.विशिष्ट शब्द विशिष्ट शब्दाबरोबर आल्यास त्या शब्दाना अर्थ प्राप्त होतो.दुसऱ्या शब्दाबरोबर आल्यास अर्थ प्राप्त होत नाही.ही शब्दाची जोडी अनन्यसाधारण अशी असते त्यास अनन्यसाधारण रूपिम असे म्हणतात.

उदाहरणार्थ १)अकारविल्हे=अकार+विल्हे

-विल्हे' चा अर्थ लागत नाही

२) घरगुती=घर+गुती 'गुती' चा अर्थ लागत नाही.

३) हातखंडा=हात+खंडा 'खंडा' याचा अर्थ लागत नाही.

२) *मिलन रूपिम*

दोन वेगवेगळे रूपिम एकत्र येऊन नवीन रूपिम तयार होते त्यास मिलन किंवा मिश्र रुपिम असे म्हणतात.

**उदाहरणार्थ:**

१) करतो - तो - ओ - ए

२) बोलतो - तो - ओ - ए

ओ, ए या प्रत्ययात लिंग, वचन अशी दोन्ही कार्य करण्याची क्षमता ज्या रूपिमात असते त्यास मिलन रूपिम असे म्हणतात. दोन अर्थाचे मिलन रूपिमात असते. मिलन रुपिमांना व्याकरणिक अर्थ ही असतो.

**३) मुक्त रूपिम:**

जी रूपिमे भाषेत स्वतंत्र येतात त्यांना मुक्त रूपिमे असे म्हणतात.

उदाहरणार्थ आकाश, सुशील, वैशाली, माणूस, आंबा, ढग, देव, गुरुजी इ.

**४) बध्द रूपिम:**

जी रूपिमे कधीच स्वतंत्र येत नाहीत ते दुसऱ्या रुपिमांना जोडून आल्यामुळेच अर्थ प्राप्त होतो त्यास बध्द रूपिम असे म्हणतात.

**उदाहरणार्थ:**

१) माणुसकी ---- की

२) आंब्याचे ----- याचे

३) देवांचा ----- चा

४) सुरेख ---- सु

५) तो ---- ओ

६) असाधरण --- अ

७) दररोज ----- दर

की, याचे, चा, सु, मो, आ, दर, इत्यादी रूपिमे जोडून आल्यामुळे त्यास बध्द रूपिम असे म्हणतात.

ही बध्द रुपिमे, रूपिमांच्या सुरूवातीला किंवा शेवटी जोडून येतात याचा अर्थ शब्दसाधित प्रत्यय, विकारदर्शक प्रत्यय आणि उपसर्ग यांचा समावेश बध्दरुपिमात होतो.

**रुपिकांतराचे प्रकार:**

रूपिका, रूपिम आणि रूपिकांतर या संकल्पना एकमेकांवर असून त्या परस्परपूरक आहेत.रूपिका ही भाषानिरषेक्ष असतात. भाषानिरषेक्ष रुपिका भाषासापेक्ष होतो म्हणजेच रूपिकांना भाषेत प्रत्यक्षात वापरले जाते त्यास रूपिम असे म्हणतात. रूपिकांचे भाषेत प्रत्यक्ष वापर झाल्यावर त्या रुपिकांमध्ये बदल होतो. परंतु हा बदल अर्थभेदक नसतो. म्हणून अशा रूपिकांना त्याच रूपिकांचे रुपिकांतरे असे म्हणतात

उदाहरणार्थ 'माणूस' या रूपिकेची माणसा, माणसात, माणसांचा, माणसाची, माणसांमुळे, माणसाचे, ही रूपिकांतरे आहेत. भाषेत प्रत्यक्षात रूपिकांतरेच असतात. रूपिकांचा सादृश्य गट म्हणजे रुपिकांतर असते. रूपिकांतर हे भाषेतसापेक्ष असतात. प्रत्येक रुपिकांतर हे रूपिका असतेच. उदाहरणार्थ

'माणूस' ही रुपिका आहे. 'माणूस' या रूपिकांचा प्रत्यक्ष भाषेत (वाक्यात) जेव्हा वापर होतो तेव्हा रुपिम होते. जसे की,

तो माणूस चांगला आहे, या वाक्यातील 'माणूस' ही रुपिका भाषेत प्रत्यक्षात वापरल्यामुळे तिला रूपिम म्हटले जाते. त्या माणसात चांगला गुण आहे. या वाक्यात रुपिमांच्या रुपात बदल झाला परंतु अर्थात बदल झाला नाही अशावेळी रूपिकांतर होते.

भाषेत असतात ती रूपिकांतरेच असतात. रूपिकांतराचे प्रतिनिधित्व करणारा घटक म्हणजे रूपिम असतो. रूपिम हे काल्पनिक असतात. आपण 'फळ' असा शब्द वापरतो परंतु फळ नावाची वस्तू वास्तवात नसते ती काल्पनिक आहे म्हणून 'फळ' ही रुपिम आहे. परंतु प्रत्यक्षात असतात ते अंबा, चिंच, पेरू, डाळिंब, सिताफळ, रामफळ, चिकू, केळी यांना रुपिकांतरे म्हटले जाते. या सर्व शब्दाचे प्रतिनिधित्व 'फळ' हा शब्द करतो म्हणून त्यास रूपिकांतर म्हटले जाते. रुपिकांतर संकल्पना समजल्यावर त्यांचे प्रकार पुढीलप्रमाणे पाहाता येईल.

रूपिकांतराचे एकुण तीन प्रकार पडतात. त्याची माहिती पुढीलप्रमाणे पाहाता येईल

**१. स्वनिमाश्रयी रूपिकांतर:**

रूपिमांचे रूपिकांतर होताना रूपिमाच्या रूपात (स्वनाचा) स्वन्यात्मक बदल होता त्यास स्वनिमाश्रयी रूपिकांतर असे म्हणतात.

उदाहरणार्थ

१) देऊळ - देवळात

२) पैसा - पैशामुळे

वरील उदाहरणात 'ऊ' ऐवजी 'व' हे स्वन आले आहे. दुसऱ्या उदाहरणात 'स' ऐवजी 'श' स्वन आले आहे. रुपिमाच्या रुपात स्वन्यात्मक बदल होतो तेव्हा स्वनिमाश्रयी रूपिकांतर असे म्हटले जाते. अशीच काही उदाहरणे पुढीलप्रमाणे सांगता येतात.

**उदाहरणार्थ** १) मासा - माशाला

२) ससा - सशाला

३) फासा - फाशाचा इत्यादी.

**२) रूपिमाश्रयी रूपिकांतर :**

रूपिमांच्या बाह्य रूपात बदल झाला की, रूपिकाश्रयी रुपिकांतर होते. रुपिकांतरे रूपिमाच्या मूळ रूपिमांशी संबंधित असतात.

**उदाहरणार्थ**

१) करतो - केला

२) मारतो - मेला

३) जातो - गेला

५) हो - झाले

६) अस - आहे

७) ये - आला

अशाप्रकारे रुपिमांच्या बाह्य अंगात बदल झाला की, रूपिमाश्रयी रुपिकांतर असे म्हटले जाते.

**३) शून्य रूपिकांतरे:**

भाषेतील काही रूपाचे अनेकवचन होताना मूळ रूप जसेच्या तसे रहाते त्यात काहीही बदल होत नाही त्यास शून्य रूपिकांतरे असे म्हणतात

**उदाहरणार्थ:**

एकवचन अनेकवचन प्रत्यय

| | | | | |
|---|---|---|---|---|
| पक्षी | = | पक्षी | = | ० |
| देव | = | देव | = | ० |
| खडू | = | खडू | = | ० |
| लाडू | = | लाडू | = | ० |
| पोपट | = | पोपट | = | ० |
| साप | = | साप | = | ० |
| मोर | = | मोर | = | ० |
| कवी | = | कवी | = | ० |

वरील रूपाचे अनेकवचन होताना रूप जसेच्या तसे रहाते. त्यास कोणतेही प्रत्यय लागत नाही म्हणून त्यास शून्य रूपिकांतर असे म्हटले जाते.

**रूप आणि प्रक्रिया:**

भाषेतील सर्वात लहान व अर्थपूर्ण घटक म्हणजे रूपिम होय. रूपिमाचे शब्द कसे बनतात हे पुढील प्रकारच्या प्रक्रियेनी सिध्द होते हे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**अ) प्रत्यय प्रक्रिया:**

शब्दांना अनेक प्रकारचे प्रत्यय लावून भाषेतील रुपे तयार होतात.या प्रत्ययानी रूपिमाच्या अर्थात वाढ होते हे प्रत्यय चार प्रकारचे आहेत.

**१) पूर्वप्रत्यय:**

धातूच्या पूर्वी म्हणजेच अगोदर जे प्रत्यय लागतात त्यास पूर्वप्रत्यय असे म्हणतात.

**उदाहरणार्थ:-** अ - भाव

गै - समज

वि - ज्ञान

नि - रोगी

नि - र्लज्ज

**२) उत्तरप्रत्यय:**

धातू किंवा अंगाच्या शेवटी हे प्रत्यय लावले जातात त्यांना उत्तर प्रत्यय असे म्हणतात.

उदाहरणार्थ:- खारट, शहाणपणा, ओढाळ गावकी

वरील उदाहरणात ट,पणा,ळ,की,हे उत्तर प्रत्यय आहेत.

**विकारी प्रत्यय:**

घरात, दारात, गावाची, उंदरापासून, माझ्यामुळे

वरील धातूला त,ची, पासून,मुळे ही विकारी प्रत्यय लागली आहेत.

**३) मध्यप्रत्यय :**

येथे प्रत्यय अंगाच्या किंवा धातूच्यामध्ये येतो. मध्यप्रत्ययाची उदाहरणे संस्कृत, लॅटीन, ग्रीक इ. विदग्ध भाषेमध्ये विशेषतः आढळतात. संस्कृतमधील क्रियापदाचा सातवा गण यासाठी प्रसिद्ध आहे.उदा:

**अरबी धातू/अंग:**

१) क-त-ब

रूपे:- काताब- मराठी अर्थ-

त्याने लिहिले

तिक्तिब- मी लिहिते

काताब (मध्यप्रत्यय आ)

तिक्तिब ( मध्यप्रत्यय त,इ)

छिद छीनति (मध्यप्रत्यय न )

खोदणे तो खोदतो न

वरील उदाहरणात मूळ धातूच्या अंगात मध्यप्रत्यय आलेले दिसतात.

**४) अतिरिक्त प्रत्यय:**

हे प्रत्यय धातूच्या अगोदर नंतर किंवा मध्यभागी येत नाहीत तर हे प्रत्यय धातूच्या उच्चाराबरोबर येतात अशाप्रकारचे प्रत्यय संस्कृत भाषेत मोठ्या प्रमाणात आहेत. हे प्रत्यय विशिष्ट चिन्हांनी दाखवले जातात.

उदा:- कऊ - मी खातो

कऊ - तू खातोस

नकऊ - तो खात आहे

कडे,कडें , कडे

वरील उदाहरणात उभ्या व ऊकार, उभ्या, व तिरकस रेषा म्हणजे अतिरिक्त प्रत्यय आहे.

**आ) शून्यप्रत्यय :**

शून्यप्रत्यय ही सुद्धा एक महत्त्वाची प्रक्रिया आहे. मूळ धातूचे अनेकवचन होताना प्रत्यय शून्य लागलेले असतात त्यांना शून्य प्रत्यय असे म्हणतात.

एकवचन -अनेकवचन- प्रत्यय

१) लाडू = लाडू = ०

२) देव = देव = ०

३) दासी = दासी = ०

४) पोपट = पोपट = ०

वरील धातूचे अनेकवचन होताना प्रत्यय शून्य लागतात त्यास शून्य प्रत्यय असे म्हणतात.

**आ) द्विरावृती:**

संपुर्ण धातू किंवा त्याचे अंश यांची पुनरावृत्ती होते त्यास द्विरावृती असे म्हणतात.

उदाहरणार्थ

सामानसुमान, टंगळमंगळ, म्हातारे कोतारे, कडकडाट, खडखडाट इत्यादी.

**इ) अंगादेश:**

ज्यावेळी संपूर्ण धातूच्या रूपालाच दुसऱ्या संपूर्णपणे भिन्न अशा रुपाचा आदेश असतो त्यास सर्वादेश/अंगादेश असे म्हणतात.

**उदाहरणार्थ**

होतो - झाला

जातो - गेला

येतो - आला

वरील उदाहरणात हो-झा, जा-गे, ये-आ असे मूळ रूपालाच अंगालाच आदेश त्यास अंगादेश असे म्हणतात.

**इ) शब्दक्रम:**

शब्दांचा क्रम बदलल्यास त्या शब्दाचा अर्थ ही बदलतो त्यास शब्दक्रम असे म्हणतात.

**उदाहरणार्थ:-** 'धनपती' या शब्दाचा क्रम बदलल्यास 'पतीधन' असा हास्यास्पद अर्थाची निर्मिती होते त्यास शब्दक्रम असे म्हणतात.

**सामासिक शब्द:**

दोन स्वतंत्र मुक्त रूपिम एकत्र येऊन ज्या शब्दांची निर्मिती होते त्यास सामासिक शब्द असे म्हणतात.

**उदाहरणार्थ:**

सुशीलप्रकाश, रामकृष्ण, मीठभाकर, साखरभात , कमलनयन, रामसीता, दयानंद इत्यादी.

अशाप्रकारे दोन शब्दांच्या एकत्र येण्याने जो नवा (साधित) रूपिम तयार होतो.त्यामध्ये त्या दोन शब्दांच्या अर्थापेक्षा कधी कधी वेगळा, अधिक व्यापक अर्थ आलेला असतो.

**अभ्यस्त शब्द:**

समासरचनेमध्ये दोन मुक्त रूपिम एकत्र येऊन एकेक वेगळा, नवा साधित शब्द तयार होतो. तर अभ्यास्तामध्ये एकाच रूपिमाची पुनरावृत्ती होऊन नवीन शब्द तयार झालेला असतो त्यास अभ्यस्त शब्द असे म्हणतात. अभ्यस्त शब्दांचे प्रकार खालीलप्रमाणे सांगता येईल.

**१) पुर्णाभ्यास्त शब्द:**

या प्रकारच्या शब्दांमध्ये शब्दांची पुर्णपणे पुनरावृत्ती झालेली असते, त्यास पुर्णाभ्यास्त शब्द असे म्हणतात.

*नाम :- हळहळ,बडबड, चिवचिव,

*विशेषण :- गारगार,ऊनऊन, मऊमऊ,

*क्रियापद :- लखलख, मळमळ, गुणगुण,भुणभुण,

*अव्यय :- लुटुलुटु,बडबड,ऊनऊन, मुळूमुळू इ.

**२) अंशात्मक अभ्यस्त:**

मूळ शब्दांमध्ये अंशतः बदल झालेला असतो त्यास अंशात्मक अभ्यस्त शब्द असे म्हटले जाते.

नाम पळापळ, लावालव, धावाधाव,

विशेषण :- गरमागरम

अव्यय :- पटापट,दारोदार, काठोकाठ

## ३.२ समारोप

उपरोक्त प्रकरणात रूपिका, रूपिम, रूपिकांतर या संकल्पना स्पष्ट केल्या आहेत. रूपविचार, त्याचे, स्वरूप प्रकार त्याचबरोबर शब्द, प्रत्यय, पद, व शब्दसिध्दी या सर्व घटकांचा अंतर्भाव या प्रकरणात होतो. शब्द, शब्दांच्या विविध जाती, प्रत्ययांचे विविध प्रकार विशेषणात्मक व शब्दसिध्दी करणारे व शब्दांच्या एकत्र येण्यातून सिद्ध होणारे सामासिक शब्द या सर्वांचा समावेश रुपिमविचारात होत असतो म्हणूनच शब्द, प्रत्यय व पद या व्याकरणातील कल्पनांच्या आधारे रूपिमाचे स्वरूप स्पष्ट केले असले तरी रुपिमकल्पनेतील भाषाविज्ञानाची वेगळी व स्वतंत्र दृष्टी लक्षात घ्यावयास हवी

## ३.३ सरावासाठी काही प्रश्न

१) रूपिका, रूपिम आणि रूपिकांतर या संकल्पना स्पष्ट करा.

२) रुपिका आणि शब्द यातील फरक विशद करा

३) रूपिम म्हणजे काय? सांगून रूपिमाचे प्रकार स्पष्ट करा.

४) रूपिकांतर म्हणजे काय? सांगून रूपिकांतराचे प्रकार सोहाहरण लिहा.

५) रूप आणि प्रकियाचे स्वरूप स्पष्ट करा.

**टिपा.**

१. शून्य रुपिकांतर

२. रुपिका

३. वैकल्पिक विनियोग

४. व्यवच्छेदक विनियोग

**खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. रुपिम म्हणजे काय?

२. रुपिका व शब्द तुलना करा

३. पूरक विनियोग म्हणजे काय?

४. मुक्त रुपिम म्हणजे काय?

*****

# ४

## अर्थविन्यास

प्रिय विद्यार्थ्यांनो,

अर्थविन्यास या चौथ्या घटकात खालील उपघटकाचा अभ्यास करावयाचा आहे.

**घटक रचना**

४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ अर्थाचे स्वरूप

४.३ अर्थ म्हणजे प्रतिमा

४.४ सरावासाठी काही प्रश्न

४.५ संदर्भग्रंथ सूची

## ४.० उद्दिष्टे

१) अर्थविन्यास या घटकाची विद्यार्थ्यांना माहिती करून देणे

२) अर्थविचाराचे स्वरूप उलगडून दाखविणे.

३) अर्थविचार या घटकांच्या प्रकाराची माहिती विद्यार्थ्यांना देणे

४) शब्द आणि अर्थ यांचे परस्परसंबंध स्पष्ट करणे.

५) अर्थ, अर्थ सहसंबंध स्पष्ट करणे

६) अर्थक्षेत्र ही संकल्पना विद्यार्थ्यांना समजून सांगणे.

## ४.१ प्रस्तावना

जीवनाच्या विविध क्षेत्रात विचारविनिमयाचे साधन म्हणून आपण भाषा वापरत असतो. प्रत्येक भाषेतील संप्रेषण हे शब्द व वाक्यांच्या माध्यमातूनच होतो. प्रत्येक वेळी शब्दांचा, वाक्यांचा अर्थ लक्षात घेऊनच भाषेचा व्यवहार होतो. भाषेतील शब्दांचा व वाक्यांचा अर्थ कोणत्या पध्दतीने घ्यावा हे सांगणे कठीण असते.

इ.स.१९५७ मध्ये चॉमस्कीने अर्थविचार हा भाषाविज्ञानाचा अत्यंत महत्त्वाचा घटक मानला.भाषिक संदेशनासाठी अर्थविचार या घटकाची आवश्यकता वाटली. स्वनिम, रूपिम, व वाक्य यांचा विचार करताना त्यातून व्यक्त होणारा 'अर्थ' हा महत्त्वाचा आहे याचे महत्त्व भाषाभ्यासकांना समजले. एखादा शब्द किंवा वाक्यांचा अर्थ व्यक्ती, स्थळ, वय, लिंग, संदर्भ, परिस्थितीनुसार बदलत असतो. त्यामुळे अर्थ म्हणजे नेमके काय? किंवा अर्थाची

व्याख्या करणे अवघड आहे, तरीही अर्थाचे स्वरूप, अर्थाचे सिध्दांत, अर्थाचे प्रकार, यातून अर्थ संकल्पना समजण्यास मदत होईल.

## ४.२ अर्थाचे स्वरूप

अर्थाची व्याख्या करणे कठीण असले तरी अर्थाचे स्वरूप लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.अर्थाच्या संदर्भात काही प्रश्न निर्माण होतात. अर्थाचे स्वरूप लक्षात घेण्यासाठी भाषाविज्ञानाने सांगितलेले तीन मार्ग आहेत त्याची माहिती पुढीलप्रमाणे पाहाता येईल.

१) शब्दांना जो अर्थ प्राप्त होतो किंवा असतो तो निश्चित करणे.

उदा:- सुशील, पाणी, सिताफळ, उंदीर,घोडा, चिमणी इ.शब्दातून वस्तू, पशूपक्षी, व्यक्ती लक्षात येते. शब्दातून लक्षात येणाऱ्या अर्थाने वाक्यार्थ, कळतो आणि त्यातून अर्थ संदेशन लक्षात येतो.

२) अर्थाच्या संदर्भात काही प्रश्न निर्माण होतात ते म्हणजे नेमका अर्थ कशात असतो? शब्दाचे वाक्यात उपयोजन केल्यामुळे त्याला अर्थ येतो की, सर्व शब्द एकत्र असल्यामुळे त्यास अर्थ प्राप्त होतो?

शब्दांचा अर्थ महत्वाचा की वाक्यांचा महत्वाचा?बऱ्याच वेळेस वाक्याच्या संदर्भातच शब्दार्थ महत्वाचा ठरतो. किंवा शब्दांला अर्थ येतो.

उदा;- १) तुझे नाव काय आहे?

२) पाण्यात नाव असते

वरील वाक्यात 'नाव' या शब्दाचे अर्थ भिन्नभिन्न आहेत. हा भिन्न पणा वाक्यात शब्दांचा वापर केल्यामुळे आला आहे.

३) भाषिक संप्रेषणाच्या संदर्भात च अर्थाचे विवेचन करताना वाक्यांचा अर्थ लक्षात घ्यावा लागतो. शब्दांना अर्थ येतो तो वाक्याच्या संदर्भात आणि वाक्याला अर्थ प्राप्त होतो भाषिक व्यवहाराच्या संदर्भात कारण शब्द, रूपिका यांना फक्त शब्दकोशीय अर्थ असतो. त्याना जो अर्थ खऱ्या अर्थाने प्राप्त होतो, त्यांचा वापर जेव्हा भाषिक व्यवहारासाठी वाक्यात केला जातो.

**अर्थ म्हणजे निर्देश:**

प्रत्येक शब्द कोणत्या तरी वस्तू, व्यक्ती, स्थल, कृती, गुण किंवा कृतीतील गुणवैशिष्ट्यांचा निर्देश करतात.तो निर्देश म्हणजेच त्या शब्दाचा अर्थ असतो.

उदा:-पेन, पुस्तक, वैशाली, सुशील, हैद्राबाद, लातूर, धरणे, मारणे, रडणे, सुंदर, थंड, कडू इत्यादी.

वरीलपैकी मारणे, धरणे, रडणे ही क्रियापदे कृतीचा निर्देश करतात. सुंदर, थंड, कडू यासारखे शब्द गुणाचा निर्देश करतात तर हळूवार, झरझर, पटपट ही क्रियाविशेषणे कृतीच्या पध्दतीचा निर्देश करताना दिसतात.

परंतु वरील सिद्धांतावर आक्षेप घेतला जातो. तो म्हणजे भाषेतील सर्वच शब्द निर्देश करीत नसतात. परंतु, पण, व आणि चा, ची, चे हे शब्द कशाचा ही निर्देश करू शकत नाहीत, तसेच स्वर्ग, नरक, या शब्दांनी निर्देश होणाऱ्या वस्तूंना अस्तित्व नाही. त्या काल्पनिक आहेत त्यामुळे अर्थ म्हणजे निर्देश ही व्याख्या खरी ठरू शकत नाही.

## ४.३ अर्थ म्हणजे प्रतिमा

प्रत्येक शब्द आपल्या मनात कोणती तरी प्रतिमा निर्माण करीत असतो किंवा एखाद्या शब्द उच्चारताच एक प्रतिमा आपल्या डोळ्यासमोर उभे राहते म्हणून अर्थ म्हणजे प्रतिमा ही व्याख्या समोर येते. 'आई' हा शब्द उच्चारताच आईची प्रतिमा आपल्या डोळ्यासमोर उभी राहाते. प्रतिमा म्हणजे त्या शब्दाचा अर्थ असतो.त्याचप्रमाणे गाय, घोडा, बैल, कुत्रा, गुरूजी, हे शब्द उच्चारताच त्यांच्या प्रतिमा डोळ्यासमोर उभी रहातात.

वरील  उपपत्तीत काही उणीवा आहेत. ज्याप्रमाणे 'आई' हा  शब्द उच्चारताच प्रत्येकाच्या मनात एकच प्रतिमा कशी निर्माण होईल. त्यासाठी सर्वांची आई एकच असायला हवी पण व्यवहारात तसे शक्य नसते. प्रत्येकाच्या मनात त्याच्या आईची वेगवेगळी प्रतिमा निर्माण होईल.

'दूध' हा शब्दाचा उच्चार करताच प्रत्येकाच्या मनात निर्माण होणारी प्रतिमा सारखीच असेल असे म्हणता येणार नाही तर कुणाला दुधाचा पांढरेपणा चटकन जाणवेल तर कुणाला दूध देणारी कपिला गाय दृष्टीस येईल तर कुणाला दुधातील मधुरता चटकन जाणवेल. यावरून हे लक्षात येते की, प्रतिमा या व्यक्तिसापेक्ष असतात एकच प्रतिमा एका शब्दांतून निर्माण होईल असे म्हणता येत नाही.'सुंदर' या शब्दाचा उच्चार करताच प्रत्येकाच्या मनात त्या व्यक्तीच्या कल्पनेनुसार सुंदर स्त्री,सुंदर फळे, सुंदर शर्ट अशी अनेक व्यक्तीपरत्वे अन्यप्रतिमा निर्माण होऊ शकतात म्हणून अर्थ म्हणजे प्रतिमा ही उपपत्ती अर्थपूर्ण आहे असे म्हणता येत नाही.

## ४.४ अर्थ म्हणजे संकल्पना

शब्दांचा अर्थ दाखविण्यासाठी अर्थ म्हणजे प्रतिमा ही उपपत्ती आपण अभ्यासली या उपपत्तीत काही उणीवा असल्यामुळे अर्थ म्हणजे संकल्पना ही उपपत्ती पुढे आली आहे.वरील उपपत्तीपेक्षा अर्थ म्हणजे संकल्पना ही उपपत्ती  व्यापक आहे कारण संकल्पना या शब्दांचा अदृश्य, दृश्य, वास्तव व काल्पनिक सत्य,असत्य, व्यावहारिक,अव्यवहारिक अशा अनुभवाचा समुच्चय होतो

**उदा:-** घर, देऊळ, ऑफिस, सामाजिक बांधिलकी, विधानसभा, शहाणपणा, सौंदर्य, एकात्मता, गोड, आंबट, पळणे, आम्ही इ. शब्द म्हणजे संकल्पना आहेत कारण त्यातून दृश्य आणि अदृश्य अनुभव साकार होतो. म्हणून अर्थ म्हणजे स़ंकल्पना ही अर्थाची व्याख्या

बरीच व्यापक ठरते परंतु या व्याख्येत अपुरेपणा आहे. संकल्पना काय हेच नक्की ठरवता येत नाही बरेच शब्द असे आहेत की, त्यातून सूचित होणाऱ्या संकल्पनेबद्दल एकमत होणार नाही.

सुख व दुःख ही संकल्पना व्यक्तिसापेक्ष आहे. सुखाचा अनुभव दुसऱ्यासाठी लागू पडेल हे निश्चित नसते.एकाला होणारे दुःख दुसऱ्याला कदाचित सुखाचा अनुभव देऊन जाईल म्हणून अर्थ म्हणजे संकल्पना हा सिध्दांत देखील फसवा आहे.

अशाचप्रकारे अर्थ म्हणजे काय? हा प्रश्न बुध्दी कुंठीत करणारा आहे कारण अर्थाचा अर्थ ठरविताना भाषाशास्त्राला मर्यादा पडतात त्या ठिकाणी मानसशास्त्राचा आधार घ्यावा लागतो.

**अर्थविन्यास:**

***अर्थाचे प्रकार*:**

शब्दांना जो अर्थ प्राप्त होतो त्याच्या भाषिक उपयोजनानुसार शब्दार्थाच्या स्तरावर अर्थाचे प्रकार पुढीलप्रमाणे करता येतात.

**१) सांकल्पनिक अर्थ:**

प्रत्येक शब्दास एक मुख्य अर्थ असतो. तो शब्द उच्चारताच त्या शब्दाचा प्रथम अर्थ लक्षात येतो त्यास सांकल्पनिक अर्थ असे म्हणतात. त्या शब्दांमध्ये कल्पना मिसळलेल्या असतात.

उदा:-'आई' हा शब्द आहे परंतु त्यात स्त्री, प्रौढ, माणूस, मायाळूपण, मादी, विवाहित असे अर्थघटक सामावलेले असतात त्यास सांकल्पनिक अर्थ असे म्हणतात.

'पाणी'हा शब्द आहे परंतु त्यात एक द्रव्य पदार्थ, तहान शमविण्याचे साधन, नितांत गरजेची एक वस्तू असे अनेक अर्थ घटक त्या शब्दात सामावलेले असतात. प्रत्येक शब्दात एक सांकल्पनिक अर्थ असतो. प्रत्येक शब्दांचा सांकल्पनिक अर्थ म्हणजे त्या शब्दाचा मूळ अर्थ असतो. त्याचा तो मूळगाभा असतो. एखाद्या शब्दांचे मूलघटक सांगता येतात यास सांकल्पनिक अर्थ असे म्हणतात.

**२) गुणव्यंजक अर्थ :**

शब्दांचा सांकल्पनिक अर्थ कायमच रहातो. परंतु त्या शब्दाला भाषिक व्यवहारात वेगळा अर्थ प्राप्त होतो. हा वेगळा अर्थ पुर्णपणे सांकल्पनिक अर्थापेक्षा वेगळा नसून सांकल्पनिक अर्थासहच येतो. पण सांकल्पनिक अर्थापेक्षा तो वेगळा असतो त्यास गुणव्यंजक अर्थ असे म्हणतात.

**उदा:**

**१) वागायला तो राजा माणूस आहे:**

या वाक्यात 'राजा' या शब्दाचा सांकल्पनिक अर्थ कायमच आहे पण दिलदारपणा, खानदाणीवृती, हा गुणव्यंजक अर्थ त्याला प्राप्त आलेला आहे.

**२) तुम्ही हाडाचे मास्तर आहात:**

या वाक्यात 'हाडं' या शब्दाचा अर्थ केवळ शरीरातील हाडं एवढाच अर्थ होत नाही तर तुम्ही विद्यार्थ्यांना तळमळीने शिकवता, प्रामाणिकपणाने तासिका घेता, विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी सोडवता, तुमच्या विषयावर तुमचा चांगले प्रभुत्व आहे.तुमची शिकविण्याची पद्धत चांगली आहे अशा मास्तरांना हाडाचे मास्तर आहात असे म्हटले जाते.

**३) ते घर चांगले आहे तेथे मुलगी देण्यास हरकत नाही:**

अशा रचनेत 'घर' या शब्दांचा अर्थ केवळ दगड धोंडयानी बांधलेली निवाऱ्याची जागा एवढाच अर्थ होत नाही तर घरातील माणसं सभ्य सुसंस्कृत, सुखवस्तू, श्रीमंत, प्रतिष्ठित, मायाळू, माणूसपणाचे आहेत हे सूचित होते. वरील वाक्यातील 'घर' या शब्दाचा अर्थ सांकल्पनिक अर्थापेक्षा वेगळा आहे.

**४) 'गरीबांची चटणी भाकरी गोड करून घ्या':**

असे जेव्हा म्हटले जाते तेव्हा 'चटणीभाकर' एवढाच अर्थ त्यातून सूचित होत नाही तर गरीबांनी केलेला पाहुणचार असा अर्थ सूचित होतो.

गुणव्यंजक अर्थाची अशीच काही उदाहरणे खालीलप्रमाणे आहेत.

१) तिच्या गोड गळ्यातून सुंदर स्वर बाहेर पडले.

२) तो म्हणजे नुसता बैलोबाच

३) त्या गाढवाचं कशाला ऐकतोस?

४) ती अगदी गरीब गाय आहे.

**३) शैलीगत अर्थ:**

मानवी व्यवहारात खुपदा शब्दांचा वापर शैलीदार असतो. प्रत्येक व्यक्तीची बोलण्याची, शब्द वापरायची विशिष्ट अशी पध्दत असते त्यालाच शैली असे म्हणतात. व्यक्तीच्या शब्द निवडीमागे त्या व्यक्तीचे वय, वृत्ती, सवय, संस्कार, शिक्षण, व्यवसाय, सामाजिक दर्जा, परिसर इत्यादी अनेक गोष्टी कारणीभूत असतात. व्यक्ती त्यानुसार शब्दांची निवड करतो त्यास शैलीगत अर्थ असे म्हणतात.

**उदा:-**

१) `मी भोजन करते.

२) `मी जेवते.

३) `मी खाऊन घेते.

४) `मी भाकरतुकडा खाते.

५) `मी डबा खाते.

६) मी एकदाचे गिळते.

पोटाची आग शमविण्याच्या या प्रक्रियेला समान अर्थाचे अनेक शब्द आहेत. शब्दाची निवड व्यक्तीचे वय, शिक्षण, सामाजिक दर्जा, परीसर, संस्कार यानुसार शब्दांचा वापर केला जातो त्यालाच शैलीगत अर्थ असे म्हणतात.अशीच काही शैलीगत अर्थाची उदाहरणे पुढीलप्रमाणे आहेत.

१) श्रीमुख, तोंड, मुकुट, मुख, थोबाड, चेहरा.

२) पद, पाय, तंगडे, टांग, चरण.

३) माता, आई, माय, जननी, माऊली, मातोश्री, जन्मदात्री, मम्मी.

**४) भावपर अर्थ :**

स्वतः:च्या मनातील भाव व्यक्त करण्यासाठी वक्ता आवाजाची चढउतार करतो आणि त्यामुळे काही शब्दांचे उच्चारण आघातयुक्त होते. त्यामुळे शब्दांना जो अर्थ प्राप्त होतो त्यास भावपर अर्थ असे म्हणतात.

**उदा:-** खालील रचनेत 'शहाणा' या शब्दाचे कसे विविध भावपर अर्थ होतात हे दिसून येते.

१) असशील *शहाणा* तर आपल्या घरचा.

२) फार *शहाणा* आहेस बडबडू नकोस.

३) आमचा बाळ खरच *शहाणा* आहे बरं काय?

वरील तीनही वाक्य रचनेत विशिष्ट सुरावलीमुळे अनुक्रमे विरोध,तुच्छता, प्रेमळपणा हे भाव सूचित झाले आहेत.

१) तुम्ही हुशार आहात (सरळ सरळ हुशार)

२) माहीत आहे तुम्ही फार हुशार आहात (उपहासात्मक)

वरील पहिल्या वाक्यात सरळ सरळ अर्थ आहे तर दुसऱ्या वाक्यात उपहासात्मकता आहे.

**उदा:-**'फार छान वागलास' हे वाक्य वेगळ्या सुरात उच्चारले तर त्याचा अगदी विरुद्ध म्हणजे वाईट वागलास असा अर्थ होतो.

**५) *परावर्तित अर्थ*:**

वक्ता किंवा लेखक एखाद्या शब्द एका विशिष्ट अर्थाने वापरतो; परंतु  ऐकणाऱ्या श्रोत्यांला किंवा वाचकाला वेगळाच अर्थ जाणवतो त्यास परावर्तित अर्थ असे म्हणतात.

**उदा :**

१) येथे उत्तम जोडे मिळतात.

२) त्याची कल्पना सुंदर आहे

३) वरच्या मजल्यावर एक खोली खाली आहे.

४) या कवितेचे आता मानसशास्त्रीय विश्लेषण करू या.

५) ह्याचा डबा रिकामी आहे.

वरील वाक्यात वक्ता जेवणाचा डबा रिकामी आहे या उद्देशाने बोलतो परंतु श्रोत्यांना त्याच्या डोक्यात अक्कल नाही, असे म्हटले आहे असा अर्थ घेतात अशा या प्रक्रियेला परावर्तित अर्थ असे म्हणतात.

**६) *साहचर्यपर अर्थ*:**

भाषिक उपयोजनात काही शब्दांचे साहचर्य अतूट असते.ते एकमेकांना सतत जोडून येतात.एक शब्द आला की दुसरा शब्द त्याबरोबर येतोच.काही माणसे जशी एकमेकांना धरून रहातात तसेच काही शब्द हे एकमेकांना सतत चिकटून असतात त्यास साहचर्यपर अर्थ असे म्हणतात.

**उदाहरणार्थ:**

१) बांधिलकी म्हटल्यावर ती सामाजिकच असते.

२) साहित्यिक सुप्रसिद्ध असतो.

३) संपाचा इशारा दिला जातो.

४) अध्यक्ष माननीय असतात.

५) प्राचार्य/आमदार लाडके असतात.

६) बातम्या ठळक असतात.

७) पाहुण्यांचा वेळ हा नेहमी अमूल्य असतो.

८) निधन म्हटले की, दुःखद असतेच.

९) अभिनंदन म्हटले की,ते हार्दिक असतेच.

१०) पत्रात नमस्कार हा सप्रेम असतोच.

११) कोणतीही सभा जाहीर असतेच.

अशाप्रकारे हार्दिक अभिनंदन, पाहुण्यांचा वेळ अमूल्य, निधन दु:खद, पत्रात सप्रेम, विनंती विशेष, सभा जाहीर, सोहळा संपन्न अशा शब्दांच्या जोड्या असतात त्या जोडयातून जो अर्थ व्यक्त होतो त्यास साहचर्यपर अर्थ असे म्हणतात. भाषिक व्यवहारात अशा प्रकारच्या साहचर्यपर शब्दांची परंपरा असते.

**७) *विषयार्थ*:**

काही वेळा एकच वाक्य पण त्यातील शब्दाचा क्रम बदलल्यास वाक्यांचा अर्थ बदलतो त्यास विषयार्थ असे म्हणतात.

**उदा:**

१) मुंबईहून मी आलो.

२) मी मुंबईहून आलो.

३) मी काल मुंबईहून आलो.

वरील तीनही वाक्यातील अर्थ एकमेकांसारखे वाटत असले तरी वेगळे आहेत हे लक्षात येईल.भाषेच्या व्यवहारात अशाप्रकारची योजना करून विषय अर्थ सूचित केला जातो.

**उदाहरणार्थ:-** काल संजय गावाला गेला याचा सरळ अर्थ होऊ शकतो तसेच 'काल' हा शब्द अगोदर आल्याने काल गेला परवा नव्हे असा ही अर्थ असू शकतो. याऐवजी संजय काल गावाला गेला असे म्हणताच 'संजय गेला अशोक नव्हे असा अर्थ होऊ शकतो. अशाप्रकारे रचनेत बदल करून मुख्य विषय कोणता आहे किंवा वाक्यातील अर्थाचा प्रमुख हेतू कोणता आहे हे दाखवता येते अशा रितीने जो अर्थ आलेला असतो त्याला विषयार्थ असे म्हणतात.

**३) रूप व अर्थ संबंध:**

भाषेची दोन महत्त्वाची अंगे आहेत. एक म्हणजे उच्चार आणि दुसरे म्हणजे तो उच्चारला असलेल्या शब्दाचा अर्थ; भाषेचा उच्चार लिहिण्यातून बोलण्यातून व्यक्त होतो त्यास रूप असे म्हटले जाते. या रूपाचा  आणि अर्थाचा संबंध कोणत्या पातळीवरचा असतो हे पाहणे अतिशय महत्त्वाचे आहे.

रूप आणि अर्थ याचा संबंध प्रामुख्याने दोन प्रकाराचा असतो.

१) अनेकार्थता

२) समानार्थता

**१) *अनेकार्थता*:**

ज्यावेळी एकच रूप असते पण त्यापासून भिन्न अर्थ निर्माण होतात अशा संबंधांस अनेकार्थता असे म्हटले जाते.

**उदा:-** भूक लागली,टेच लागली, मनाला लागले या रचनेत 'लागणे' हे एकच रूप असेल तर त्याचे अर्थ प्रत्येक वेळी बदलतात. 'गोटा' हे एकच रूप आहे परंतु हा शब्द भिन्न भिन्न अर्थाने वापरला जातो. जसे की,

नदीतला गोटा

चमन गोटा

खोबर गोटा

साबण गोटा

अशाप्रकारचे पुढील उदाहरणे पहाता येईल."गाडी' हे एकच रूप परंतु बैलगाडी, आगगाडी, स्कूटरगाडी, मालगाडी, घोडागाडी, वडारगाडी, मोटारगाडी असे भिन्न अर्थ सूचित होतात.

अशाप्रकारे रूप एकच पण अर्थ अनेक असतात त्यास अनेकार्थता असे म्हणतात.

**२) *समानार्थता*:**

भिन्न भिन्न रूपे आणि एकच अर्थ ज्या संबंधातून सूचित होतो,त्यास समानार्थता असे म्हणतात.

**उदा:**

१) कन्या, मुलगी, पोरगी, कार्टी, सुपुत्री, इ.

२) पाणी, नीर, तोय, जल, जीवन

३) बायको, पत्नी, मंडळी, भार्या, अर्धांगिनी, कारभारणी इ.

४) बाई, स्त्री, अंतुरी, अस्तुरी, नारी, मादी, महिला, कामिनी, शक्ति इ.

वरील उदाहरणात रूप भिन्न भिन्न असून अर्थ एकच असतो, त्यास समानार्थता असे म्हणतात.

***४) अर्थ व अर्थसंबंध*:**

भाषेतील शब्दाच्या अर्थांना अनेक छटा असतात. या छटांनाच अर्थाचा संबंध असे म्हटले जाते. अर्थ आणि अर्थ यातील संबंध दोन प्रकारचा असतो.

१) *अर्थ समावेश*

२) *अर्थविरोध किंवा बहिष्कृती*

**१) *अर्थ समावेश*:**

जेव्हा एका शब्दाच्या अर्थात दुसऱ्या अर्थाचा समावेश होतो, त्यास अर्थसमावेश असे म्हणतात.

दुसऱ्या शब्दांत सांगायचं झाल्यास एका शब्दाचे अर्थ घटक दुसऱ्या शब्दांच्या अर्थ घटकात समाविष्ट झालेली असतात.

उदा "बाई' या शब्दाचा अर्थ घटकात प्रौढ, मादी, मानव या शब्दाचे अर्थघटक

सामाविष्ट झालेले आहेत.

**२) *अर्थबहिष्कृती/ अर्थविरोध*:**

दोन शब्दांच्या अर्थघटकात किमान एक अर्थ घटक विरोधी असेल तर ते शब्द विरुद्धार्थी शब्द असतात हा अर्थविरोध मुख्यतः: चार प्रकारचा असतो.

**अ) *द्विपर्यायी विरोध*:**

यात शब्दातील अर्थविरोधाच्या सीमारेषा स्पष्ट असतात म्हणजेच एक शब्द हा दुसऱ्या शब्दांच्या पूर्ण विरोधात असतो तेथे तिसरा एखाद्या विरोधी शब्द संभवत नाही.

**उदा:**

उजेड - अंधार

पास - नापास

नर - मादी

चांगला - वाईट

रोगी - निरोगी

रात्र - दिवस

येथे दोन शब्द एकमेकांच्या विरोधी अर्थ स्पष्ट करतात.

**ब) *बहुविध विरोध अर्थ*:**

जेव्हा एखादया शब्दांच्या विरोधी एकापेक्षा अनेक शब्द विरोधी असतात त्यास बहुविध विरोध असे म्हणतात.

उदाहरणार्थ, रंगसंज्ञा तांबडा, हिरवा, पोपटी, निळा, काळा, पांढरा, पिवळा हे बहुविध विरोधाचे शब्द होत. एखादी वस्तू काळी असेल याचा अर्थ ती निळी असेल अशी नाही. ती पिवळी पांढरी असू शकेल. तसेच गवत नसेल मग झुडुप, झाड, वेल, निवडुंग काय वाटेल ते दुसरे असू शकते.

याचप्रमाणे मानव,पशू,पक्षी,किटक हे बहुविध विरोधाचे शब्द आहेत.

**क) *धुव्रात्मक विरोध*:**

यात विरोधाची दोन टोके असतात. एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत तर-तम भावाने प्रवास करता येतो, त्यास धुव्रात्मक विरोध असे म्हटले जाते.

**उदा:-**थंड व गरम ही संवेदनांची दोन टोके मानली तर कोमट अधिक गरम, अधिक थंड अशा अनेक शक्यता येतात. अशी वेगवेगळी अर्थछटा निर्माण होतात. अशाप्रकारे दोन टोकात जे मधले शब्द असतात त्यामुळे धुव्रात्मक विरोध सूचित होतो.

**ड) *व्यत्यासात्मक विरोध*:**

या प्रकारच्या विरोधात बहुतेक दिशांचा विरोध असतो.उदा:-वर-खाली

मागे -पुढे

डावा-उजवा

व्यापारी-ग्राहक

शिक्षक-विद्यार्थी

या शब्दातील विरोध हा व्यत्यासात्मक विरोध आहे.यातील विरोध या प्रकारचा असतो.

**०४ *घटक विश्लेषण*:**

घटक विश्लेषण हे शब्दांच्या सांकल्पनिक अर्थ स्पष्ट करण्यासाठी वापरले जाते. त्यामुळे एक फायदा असा होतो की, एकच अनुभव क्षेत्रातील दोन शब्दांच्या अर्थातील संबंध स्पष्ट होतो.समानार्थी आणि विरूध्दार्थी शब्द निश्चित करण्यास अशा विश्लेषणाची मदत होते.

'बाई' या शब्दात ती प्राणी, मानव, हे अर्थघटक आहेत तर नर, मातृत्व, नाते हे अर्थघटक नाहीत.

'वडील' या शब्दात प्राणी, मानव नर, नाते हे घटक सामावलेले आहेत तर मातृत्व हे अर्थघटक सामावलेला नाही.अर्थघटक आहेत हे (+) अर्थघटक नाहींत हे (-) या चिन्हाने दाखविले जाते. अशाप्रकारे घटक विश्लेषणाने भाषेतील शब्दांशब्दातील साम्य,फरक, परस्परसंबंध समजतो. घटक विश्लेषणाचा अर्थविन्यासातील उपयोग महत्वाचा आहे.शब्दाशब्दातील संबंध घटक विश्लेषणाने नेमकेपणाने स्पष्ट होतात. शब्दार्थ आणि वाक्यावर यांना जोडणारा घटक विश्लेषण हा महत्त्वाचा दुवा आहे. घटक विश्लेषणाचे दोन शब्दातील व्याकरणिक संबंध देखील दाखवता येतात.

***अर्थक्षेत्र संकल्पना*:**

अर्थविचारात अथवा अर्थविन्यासात अर्थक्षेत्र संकल्पना हा एक महत्वाचा विषय आहे. प्रत्येक भाषेत जे शब्द असतात. त्याची रचनाबद्ध योजना असते. एखादी संकल्पना तिचे

विविध घटक दाखविणारे विविध शब्द यात जो परस्पर संबंध असतो, म्हणून एक अर्थक्षेत्र सिद्ध होते. उदाहरणार्थ :- 'रंग' हे एक अर्थक्षेत्र आहे. मराठीत अर्थक्षेत्र खालील प्रमाणात विभागलेले आहे जसे:- पांढरा, काळा, पिवळा, निळा, नारंगी, पोपटी, हिरवा, पारवा, आकाशी, सेंद्री, डाळंबी, अबोली, गुलाबी, चंदेरी, रूपेरी, सोनेरी, मोतीया, भगवा, तपकिरी, शेवाळी, अंजिरी, किरमीझी, लाल, इ. शब्दरंग या एका अर्थक्षेत्रात येतात. कदाचित जगातील इतर भाषेत एवढे रंगदर्शक शब्द असतीलच असे नाही आणि काही भाषेत यापेक्षा देखील वेगवेगळ्या आणि जास्त छटा असलेल्या रंगाची संकल्पना असू शकते.

अशाप्रकारे प्रत्येक शब्दास अनेक उदाहरणे देता येतील. उदाहरणार्थ 'भाऊ' हे एक अर्थक्षेत्र आहे. या अर्थक्षेत्रात चुलतभाऊ, मामेभाऊ, अतिभाऊ, सावत्रभाऊ, मावसभाऊ, सख्खाभाऊ, साडभाऊ, अशा शब्दांनी 'भाऊ' या मराठी शब्दांचे अर्थक्षेत्र व्यापलेले आहे पण इंग्रजीसारख्या भाषेत 'Brother' (ब्रदर) एवढा एकच शब्द या संकल्पनेसाठी आहे. यावरुन नातेसंबंधातील व्यापक भावना मराठी भाषेतील शब्दावरून दिसून येते. विविध प्रकारच्या क्रिया, वस्तू, व्यक्ती याबाबतीत असे अर्थक्षेत्र दाखवता येते.

उदाहरणार्थ 'प्राणी' या एका अर्थक्षेत्रात मानव, पशुपक्षी, कीटक, जलचर, वनचरे इत्यादी शब्दांचा समावेश होतो तर 'मानव' या अर्थक्षेत्रात आदिमानव, स्त्री-पुरुष, मुलगा मुलगी, आधुनिक मानव इत्यादी शब्दांचा समावेश होतो. 'स्वच्छ करणे' या कल्पनेशी जे अर्थक्षेत्र निगडित आहे. त्यात अंघोळ करणे, स्नान करणे, धुणे धुवणे, विस्कळणे, झटकणे, निवडणे, न्हाणे, गाळणे साफ करणे, सारवणे इत्यादी क्रियादर्शक शब्दांचा समावेश होतो.

अशाप्रकारे 'अर्थक्षेत्र' ही संकल्पना घटक विश्लेषणाशी अतिशय जवळची आहे. एकाच अनुभव क्षेत्राशी संबंधित असे अनेक शब्द एका अर्थक्षेत्राखाली नेमका फरक कसा आहे, हे अर्थक्षेत्र संकल्पनेमुळे समजते. विशेषतः परकीयभाषा आत्मसात करण्यासाठी या संकल्पनेचा अतिशय चांगला उपयोग होतो. एखाद्या भाषेतील नातेदर्शक शब्दांचा समूह आपणास ती भाषा बोलणार्या लोकांची संस्कृती कशी असेल याची कल्पना येते. एखाद्या शब्दात जेवढे जास्त अर्थक्षेत्र असेल त्यावरून ती भाषा बोलणाऱ्या मानवाचे अनुभव क्षेत्र अधिक व्यापक आहे हे लक्षात येते. उदाहरणार्थ रंगदर्शक संज्ञा ज्या भाषेत अधिक असतील ती भाषा बोलणारा समाज अधिक असेल, ती भाषा बोलणारा समाज अधिक उच्च अभिरुचीचा असेल असे अनुमान काढता येते.

अशाप्रकारे या संकल्पनेचा उपयोग एखादी भाषा बोलणारा मानववंश सांस्कृतिक दृष्ट्या कोणत्या पातळीवर आहे हे अजमावता येते.

## ४.४ सरावासाठी काही प्रश्न

१) अर्थविचाराचे स्वरूप स्पष्ट करा.

२) अर्थविचाराविषयी मांडलेल्या विविध उपपत्तीचे स्वरूप उलगडून दाखवा.

३) अर्थविचाराच्या प्रकार सोदाहरण लिहा.

४) अर्थविचार म्हणजे काय? सांगून रूप आणि अर्थ संबंध स्पष्ट करा.

५) अर्थविचाराचे स्वरूप सांगून अर्थ आणि अर्थ संबंध विशद करा.

६) अर्थविचाराचे स्वरूप सांगून अर्थ घटक विश्लेषण संकल्पना स्पष्ट करा.

७) अर्थविचाराची संकल्पना विशद करून अर्थक्षेत्र संकल्पना स्पष्ट करा.

## ४.५ संदर्भग्रंथ सूची

१) कदम महेंद्र मराठीचे वर्णनात्मक भाषाविज्ञान-स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस पुणे प्रथमावृती १ जानेवारी, २००३.

२) गोविलकर लीला- वर्णनात्मक भाषाविज्ञान आरती प्रकाशन डोंबिवली पूर्व प्रथमावृत्ती जानेवारी,१९९२.

३) गोरे दादा-कैलाश पब्लिकेशन्स औरंगपुरा औरंगाबाद प्रथमा वृत्ती जुलै १९९९.

४) मालशे स.ग.आणि इतर भाषाविज्ञान: वर्णनात्मक आणि ऐतिहासिक पद्मगंधा प्रकाशन पुणे चौथी आवृत्ती २६ऑक्टोबर, २०१०.

५) कानडे मु.श्री.(संपा) मराठीचा भाषिक अभ्यास, स्नेहवर्धन, पुणे, १९९४.

६) काळे, कल्याण,सोमण अंजली (संपा.) वर्णनात्मक भाषाविज्ञान: स्वरूप आणि पध्दती, गोखले एज्युकेशन सोसायटी, नाशिक १९८५.

७) काळे, कल्याण, अंजली सोमण(संपा) आधुनिक भाषाविज्ञान: संरचनावादी आणि सामान्य प्रतिमा, पुणे १९९९.

८) पुंडे द. दि सुलभ भाषा विज्ञान स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस पुणे प्रथमावृती फेब्रुवारी १९९६.

*****